



www.surajyadigital.com

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

। शनिवार, दि. ७ सप्टेंबर २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३३९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८







# मेगा 'प्लॅन' फिक्स जम्बो 'टीम' मैदानात



## गेमचेंजरची धुरा नितीन गडकरींवर

मुंबई/वृत्तसंस्था

**राज्याची आगामी विधानसभा जिंकण्यासाठी भारतीय जनता पक्षाने जबरदस्त ताकत उभी केली आहे. लोकसभा निवडणुकीतील यशानंतर महाविकास आघाडीचा वारू रोखण्यासाठी ४ महारथी आणि २१ जणांची टीम मैदानात उतरवण्याचा प्लॅन पक्षाने तयार केला आहे. विशेष म्हणजे महाविकास आघाडीला लगाम घालण्याची विशेष जबाबदारी पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यावर सोपवण्यात आली आहे.विधानसभेची निवडणूक भाजपसाठी प्रतिष्ठेची असणार आहे.लोकसभा निवडणुकीतील पराभवाचा डाग पुसून टाकावा लागणार आहे.अन्यथा पुन्हा नाचक्की होण्याची भीती कार्यकर्त्यांमधून व्यक्त केली जात आहे.विजय खेचून घेण्यासाठी हा मेगा प्लॅन तयार करण्यात आला आहे.**

आगामी विधानसभा निवडणुकिच्या अनुषंगाने भाजपकडून मेगा प्लॅनिंग करण्यात आल्याची माहिती हाती आली आहे. भाजपच्या वतीने पक्षातील चार दिग्गज नेत्यांवर महत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे आणि रावसाहेब दानवे या चार महारथी नेत्यांवर विधानसभेसाठीची महत्वाची जबाबदारी असणार आहे.

येत्या आठवड्याभरात २० स्टार प्रचारकांची व्यवस्थापन समिती जाहीर होणार आहे. निवडणूक व्यवस्थापन समितीचे रावसाहेब दानवे पाटील हे प्रमुख संयोजक असणार आहेत. तर अशोक चव्हाण, नारायण राणे, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, विजया रहाटकर, प्रवीण दरेकर, भाई गिरकर, अशोक नेते, अतुल सावे, संजय कुटे, जयकुमार रावल, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ यांचा देखील या समितीत समावेश असणार आहे. तर दुसरींकडे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे विशेष प्रचारक म्हणून एक महिना संपूर्ण महाराष्ट्र पालथा घालणार असल्याचेही बोलले जात आहे.



### विदर्भावर लक्ष केंद्रीत

नितीन गडकरींकडे विशेष प्रचारकपद देण्यात आले आहे. ते म हिनाभर राज्य पालथं घालतील. विविध भागांत जाऊन पक्षाचा प्रचार करतील. प्रचाराचे नेतृत्व चौघांकडे सोपवणाऱ्या भाजपने स्टार प्रचारकांच्या यादीत १७ जणांना स्थान दिले आहे. लोकसभेला भाजपला सर्वाधिक फटका विदर्भ, मराठवाड्यात बसला. विदर्भातील लोकसभेच्या १० पैकी केवळ २ जागा भाजपला जिंकता आल्या. फडणवीस, गडकरी, बावनकुळे विदर्भातून येतात. तिथे विधानसभेच्या ६२ जागा येतात. त्यामुळे भाजपने विदर्भावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. विदर्भासाठी मध्य प्रदेशमधील ४ नेत्यांना सक्रिय करण्यात आले आहे. लोकसभेला मध्य प्रदेशात भाजपला २९ पैकी २९ पैकी जागा मिळवून देणाऱ्या चार नेत्याांकडे भाजपने विदर्भाची जबाबदारी दिली आहे.

काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकिच्या निकालांनी देश आणि राज्य पातळीवर भाजपला चांगलाच धक्का दिला आहे. केंद्रात आणि राज्यात भाजप प्रणित आघाड्यांची मोठी पिछेहाट झाली. राज्यातील एकूण ४८ लोकसभा मतदारसंघांपैकी भाजपप्रणित महायुतीला अवघ्या १७ जागांवर विजय मिळाला आहे. तर महाविकास आघाडीची ३० जागांवर सरशी झाली आहे.

या निकालांनी महायुती आणि भाजपचे नेते प्रचंड अस्वस्थ झाले आहेत. कारण लोकसभेचा हाच ट्रेंड आगामी विधानसभा निवडणुकीत कायम राहिला तर कदाचित महायुतीची सत्ता जाणे अटळ असल्याची शक्यता वर्तवली गेलीय.

दुसरींकडे विदर्भातील भाजपची बऱ्यापैकी पकड असलेल्या मतदारसंघातही म हायुतीचा दारुण पराभव झाला आहे. विशेष म्हणजे, विदर्भात काँग्रेसने घरवापसी करत दहा पैकी ७ ठिकाणी महाविकास आघाडीला यश मिळवून दिले आहे. तर भाजप २ आणि शिंदेच्या शिवसेनेला अवघ्या १ ठिकाणी असे महायुतीला यश आले आहे. प. महाराष्ट्रातही तीच गत आहे. त्यामुळे विदर्भासह राज्यातील सर्व जागांवर भाजपकडून विशेष मंथन करण्यात येत असून त्या अनुषंगाने भाजप तयारींला लागले आहे.

लोकसभा निवडणुकीत म हाराष्ट्रात दारुण पराभव पत्करावा लागल्यानंतर भारतीय जनता पक्षाने आता विधानसभेसाठी कंबर कसली आहे. त्यासाठी भाजपने रणनीती आखण्यासाठी सुरुवात केली आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने जम्बो टीम तयार केली आहे. त्याम केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना विशेष स्थान देण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मंत्रीमंडळात असलेल्या गडकरींकडे विधानसभेच्या दृष्टींने महत्परची जबाबदारी दिली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, या स्मार्टफोनच्या नादात मला उशीर झाला!

| कल्याण |
|---|
| 340-72-679 |

| मुंबई |
|---|
| 679-20-389 |




# चिंतेने घेरले...

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपची दिवसेंदिवस गोची होत चालली आहे. महायुतीत अजितदादांच्या रूपाने अजून पक्ष येऊन शिरल्याने भाजपला अनेक तडजोडी कराव्या लागतील, अशी चिन्हे दिसत आहेत. मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्यावरून महाविकास आघाडीत ज्याप्रमाणे धुसफूस सुरू आहे, त्याचप्रमाणे महायुतीतही यावरून घमासान सुरू आहे. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार असतील, अशी चर्चा होते आहे पण भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांना निकालानंतर हा फार्म्युला मान्य होईल की नाही कोणास ठाऊक. कारण फडणवीस हे सध्या आरएसएसच्याच संपर्कात आहेत. आरएसएस भाजप अंतर्गत करडी नजर ठेवून आहे.अजितदादांमुळेच लोकसभेत भाजपला फटका बसल्याचा ठपका आरएसएसने ठेवलेला आहेच. आरएसएसचा हा आरोप पाहाता अजितदादांना महायुतीत घेण्याची खेळी दिल्लीश्वरांनी केल्याचे स्पष्ट होते. आता पुढे काय, असा प्रश्न पुढे आला आहे. कारण अजितदादा महायुतीतून बाहेर नाही पडले तर त्यांना घालवणार काय. हा एक मुद्दा पुढे येईलच. आता तर नवीन चित्र समोर येते आहे. अजितदादांच्या पक्षामुळे भाजपमध्ये बंडखोरी होण्याची भीती व्यक्त केली गेलीय.महायुतीमुळे भाजपला आपल्या हक्कांच्या जागांवर पाणी देखील सोडावे लागणार आहे. पश्चिम महाराष्ट्रात तर भाजपपुढे काहीसा पेच आहे. येथे शरद पवार यांना मानणारा मोठा वर्ग आहे. लोकसभेला त्याचे प्रत्यंतर आले. गेल्या विधासभेला भाजपच्या जवळपास २० जागा या दहा हजारांच्या फरकाने आल्या आहेत. तेथे अशी पक्षांतरे निर्णायक ठरतील. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर राज्यातील राजकारणात लक्षणीय बदल झाले. वैचारिकदृष्ट्या ज्यांना टोकाचा विरोध केला, त्यांच्या बरोबरच आता सरकार चालवावे लागत आहे. त्यातच महायुतीमध्ये जागावाटपावरून काही समस्या आहेत. विशेषत: गेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसविरोधात भाजपचे उमेदवार अनेक ठिकाणी दुसऱ्या क्रमांकावर राहिले. अजित पवार यांचा गट बरोबर आल्याने ज्याचे आमदार त्याच्याकडे ती जागा हे सर्वसाधारण सूत्र महायुतीत मानले जाते. यामुळेच जेथे अजित पवार गटाचे आमदार आहेत तेथे भाजप किंवा शिवसेनेच्या इच्छुकांमध्ये संधी मिळणार नसल्याने चलबिचल सुरू झाली. सध्या अजित पवार गटाचे आमदार असलेल्या २३ जागांवर भाजप दुसऱ्या क्रमांकावर होता. त्यामुळेच तेथे गेल्या वेळचे उमेदवार किंवा मोर्चेबांधणी केलेले इच्छुक अन्यत्र संधीच्या शोधात आहेत. यापैकी कागल येथील बडे प्रस्थ व कोल्हापूर जिल्ह्याचे भाजपचे माजी अध्यक्ष समरजित घाटगे यांनी नुकताच शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केला. घाटगे यांच्या पक्षांतराने भाजपला धक्का बसला. मात्र, पुढे आणखी काही नेते पक्ष सोडतील अशी अटकळ आहे. पाच ते सहा नेते पक्ष सोडतील हे भाजपच्या प्रदेश नेतृत्वानेच मान्य केले. इंदापूरमध्ये हर्षवर्धन पाटील यांनीही शरद पवार यांची भेट घेतली. त्यांनी आपली भूमिका अद्याप स्पष्ट केली नाही. याखेरीज नगर जिल्ह्यातील भाजपचे काही नेते पक्ष सोडण्याची शक्यता आहे. एकेका जागेवर अनेक इच्छुक आहेत. त्यांची पाच वर्षे थांबण्याची अनेक वेळा तयारी नसते. समर्थकांचाही रेटा असतो. अशातच भविष्यातील आडाखे हेरून हे नेते पक्षांतर करतात. गेल्या निवडणुकीपूर्वी भाजपकडे पक्षांतरासाठी रांग होती. यंदा चित्र काहीसे वेगळे आहे. २८८ जागांवर दोन्ही आघाड्यांमध्ये तीन मोठे वाटेकरी आहेत. अशा वेळी इच्छुकांमध्ये धाकधूक आहे. घाटगे यांच्या पक्षांतराचा विचार केला तर, घाटगे गट हा कागल तालुक्यातील राजकारणात जुना आहे. त्यांचे वडील विक्रमसिंह घाटगे विरुद्ध सदाशिव मंडलिक असा पूर्वी संघर्ष होता. मंडलिक हे शरद पवार यांचे निष्ठावंत मानले जात. आता मंडलिक यांचे पुत्र शिंदे गटात आहेत. तर कागलमध्ये अजित पवार गटाचे मंत्री असलेले हसन मुश्रीफ हे आमदार आहेत. त्यांनाच महायुतीकडून संधी मिळणार हे पाहून घाटगे यांनी शरद पवार गटात प्रवेश केला. विधानसभेला गेल्या वेळी समरजित हे भाजपकडून लढले. आता यंदा मुश्रीफ महायुतीत असल्याने घाडगे यांना संधी अवघड होती. यातूनच त्यांनी निवडणुकीचे आडाखे बांधून पक्षांतर केले. अनेक ठिकाणी हीच समीकरणे स्थानिक परिस्थितीनुसार मांडली जात आहेत. यातून इच्छुक मात्र, अस्वस्थ असून, मतदारसंघाचे स्वरूप पाहून पक्षांतराची समीकरणे मांडली जात आहेत.

## आध्यात्मिक

# सुखकर्ता दुःखहर्ता श्रीगणेश

आपल्या भारतात वेदकाळापासून श्री गणेश पूजन प्रचलित आहे. गणपती आपले आद्यदैवत आहेत. अथर्ववेदात, गणपती अथर्वशीर्षात गणपतीच्या समग्र स्वरूपाचे सविस्तर वर्णन केलेले आहे. ऋग्वेदात सुध्दा **'गणानां त्वा गणपतिं हवामहे प्रियाणां त्वा प्रियपतिं हवामहे। निधीनां त्वा निधिपतिं हवामहे वसो मम आहमजानि गर्भधमा त्वमजासि गर्भधम् ।।'** या मंत्राने गणपतीचे आवाहन केले आहे. श्री गणेशाला तांत्रिक दैवतही संबोधलेले आहे.

भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणपती बसविण्याची पद्धत आहे. श्री गणेश ही विद्येची देवता, शंकर आणि पार्वती देवी या दाम्पत्याचा हा मुलगा गणपतीलाच गजानन, विघ्नहर्ता म्हणूनही ओळखले जाते. तशी गणेशाची नावे अनेक गणपती म्हणजे गणांचा अधिपती. प्रत्येक नावातून गणपतीचे वेगवेगळे वैशिष्ट्य प्रगट होते, गणपतीचे वेगवेगळे अवतार पहावयास मिळतात. आपल्या पुराणात गणपतीच्या जन्माविषयीच्या कथानकात एकसूत्रता कुठेच दिसत नाही. प्रत्येक पुराणात गणेश जन्मकथा ही निरनिराळया स्वरूपात वर्णिलेली आहे. बहुश्रुत व प्रचलित कथा शिवपुराणात दिलेली आहे.

एकदा कैलास या आपल्या निवासस्थानी पार्वती एकटीच असल्या कारणाने तिने स्नान करीपर्यंत तेथे कोणीही येऊ नये. आपल्या शरीराच्या मळापासून किंवा शरीरास स्नान करताना लावावयाच्या अंगलेपापासून गणेशाची निर्मिती करून त्यास व्दार रक्षण करण्याचे आदेश दिले. या गणेशाने प्रत्यक्ष शंकरास आत जाण्यास मज्जाव केल्या कारणाने शिवगण व गणेश यात भयंकर संग्राम होऊन शिवगण पराभूत झाले. यामुळे शिवशंकर कोपीत होऊन गणेशाचा शिरच्छेद केला. हे बघून पार्वतीने रौद्ररुप धारण करून सर्वत्र प्रलयकारी स्थिती निर्माण केली. सृष्टीचा लय होईल, या भीतीने व्याकूळ ऋषिमुनी व दैवादिक पार्वतीला शांत होण्याची विनवणी करतात. यावर पार्वती आपल्या मृत पुत्रास जिवंत करावे, अशी इच्छा व्यक्त करते. यावर शंकर (भोलेनाथ) त्यांच्या गणाव्दारे आणलेले गजमुख त्या बालकाच्या धडास जोडून त्या मृत बालकास जिवंत करतात. तेव्हापासून गणपती 'गजवदन' झाले म्हणजेच श्री गणेश होय.



या कथानकावर चिंतन करीत असताना व गणपती 'अथर्वशीर्षाचे नित्यवाचन करताना एक नवीन कल्पना उदयास आली व अशी लक्षात आहे की, गणपती, ब्रह्मा, विष्णू व महेशाप्रमाणे स्वयंभू किंवा सूर्य, चंद्र, इंद्र, वरुण, अग्नी याप्रमाणे शक्तीदैवत नाही. श्री गणेशाचे विचित्र रूप, देह मानवाचा, ढेरपोट्या, मन व शीर हत्तीचे पाहून पार्वती मातेला दुःख झाले. वाईट वाटले, तिने शंकराला विनंती केली की, आपल्या पुत्राला सर्व देवांमध्ये श्रेष्ठ देवता म्हणून मान मिळावा तो सदैव सत्कारमूर्ती म्हणून पूजला जावा ही विनंती भगवान शंकराने मान्य केली. तेंव्हापासून श्री गणेश सर्व प्रथम पूजेस अग्रस्थानी योग्य ठरला. तो आजपर्यंत 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही त्याची खरी महती. विशाल पोट, भक्तांचे अपराध क्षमा करण्यासाठी मोठे मोठे कर्ण याचा अर्थ वाईट ते ऐकून सोडून द्या, चांगले तेवढेच श्रवण करा. कोणत्याही मंगलप्रसंगी आपण प्रथम श्री गणेशाची पूजा करतो. पोथी पुराणाची सुरुवात गणेश स्तवनाने होते. मंगल कार्यारंभी गणेशाची प्रतिमा (चित्र) वास्तूवर लावण्याची पद्धत आहे. कार्याचे आमंत्रण, निमंत्रण पत्रिकेवर प्रथम गणेशाची प्रतिमा छापतात. गणेश ही विद्येची देवता म्हणून लहानपणी आपल्याला प्रथम पाटीवर 'श्री गणेशाय नमः' असे लिहिण्यास शिकवितात. भगवान व्यास महर्षींच्या सांगण्यावरून महाभारत ग्रंथाचे लिखाण करणारा श्री गणेश आहेत.

भाद्रपद शुद्ध चतुर्थीला मृत्तिकेपासून (प्लास्टर ऑफ पॅरिस) अथवा मातीपासून बनविलेल्या गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचा प्रघात आहे. कुल परंपरेनुसार गणपती मूर्तीचे पाच दिवसांत, सात दिवसांत अन्यथा दहा दिवसानंतर विसर्जन केले जाते. श्री गणेश मूर्ती दहा दिवस ठेवण्यामागे त्या देवतेची जास्तीत जास्त उपासना घडावी हाच हेतू आहे. प्रत्येक महिन्यात दोन चतुर्थी येतात. शुद्ध पक्षात येते ती विनायकी आणि वद्य पक्षात येते ती संकष्टी. भाद्रपद चतुर्थीला येणारी महासिध्दी विनायक चतुर्थी म्हणून ओळखली जाते. याच दिवशी गणेश मूर्तीची स्थापना, पूजा-अर्चा आणि उपासना केली जाते. गणपतीला त्यांच्या प्रिय वस्तू अर्पण केल्या जातात, मोदक हा गणेशाचा आवडता खाद्य पदार्थ, दूर्वा, शमीपत्रे, जास्वंदीची लाल फुले ही त्यांच्या आवडीचे गणपतीला आवडणारे मोदक गुळाचे व खोबऱ्याचे असतात.

सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण त्यांचा तो ईश म्हणजे प्रमुख, त्याचे वाहन उंदीर, त्याला कालाचे प्रतीक मानतात. गणपतीला सोळा विद्या, चौसष्ट कला अवगत होत्या. तो सुखकर्ता, आणि दुः खहर्ता आहे. वक्रतुंड, एकदंत, पिंगाक्ष, गजवक्त्र लंबोदर, विकट, विघ्नराज, धूम्रवर्ण, भालचंद्र, विनायक, गणपती, गजानन अशा अनेक नावाने तो ओळखला जातो.

श्री गणपतीची आराधना अथर्वशीर्षाने करतात, अथर्व म्हणजे शांत आणि शीर्ष म्हणजे मस्तक, अथर्वशीर्षाची आवर्तने करीत गणपतीला अभिषेक केला जातो. जीवनामध्ये कोणतेही निर्णय घाईघाईने घेणे घातक असते. डोके शांत ठेवत, मन ताब्यात ठेवून निर्णय घेतले गेले, तरच अंतिमतः ते फलदायी असतात. अथर्वशीर्षाचा व्यवहारात फार मोठा उपयोग आहे, त्याच्या आवर्तनाने डोके, मन, स्थिर होतात. अथर्वशीर्षाचा मूलमंत्र 'गं' असा आहे. या एक अक्षरी गणेश मंत्रात विष्णू, शंकर, सूर्य, शक्ती आणि गणेश अशा पाच देवतांचा समावेश होतो.

वेदकालापासून किंबहुना त्या अगोदरपासून गणेशोपासना सुरू होती, अशा अभ्यासकांचे मत आहे. महाराष्ट्रात गणेशभक्ती मोठ्या उत्साहात व भक्तीभावात केली जाते. अखिल भारतात प्रसिद्ध असलेली अष्टविनायकांची स्थाने ही केवळ महाराष्ट्रात विखुरलेली आहेत. शिवप्रभूंनी संपूर्ण देशभर बारा ज्योतिर्लिंगाच्या रूपाने आपली स्थाने निर्माण केली. बारा ज्योतिर्लिंगांपैकी चार महाराष्ट्रातच आहेत हे भूषणास्पद आहे. लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला सुरुवात करून सार्वजनिक स्वरूप दिले. गणेशोत्सव हे महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य होऊन बसले आहे. महाराष्ट्रात विशेषत: पुणे-मुंबईला गणपती पाहण्यासाठी गर्दी करतात. गणरायांची मिरवणूक वाजत गाजत काढली जाते. गणराय भक्तांकडून सेवा स्वीकारून त्यांचे कल्याण करतात.

दहा दिवस महाराष्ट्रात श्री गणेशोत्सवाचा धूमधडाका सुरू असतो. आपण सगळेच श्री गणेशाचे पुजक आहोत, भक्त आहोत, उपासक आहोत, गणरायाचे उत्साहाने स्वागत करीत असताना या देशावरची सर्व संकटे नाहीशी कर, अशी प्रार्थना हात जोडून आपण त्या विघ्नहर्त्याला करू या. श्री गणेश सर्वांना सुख, शांती देणारा आहे, सुख, शांती, समाधान, बंधुता, प्रेम देण्याचे ध्येय ठेवलेल्या त्या गणेशांकडून आपण गणेशोत्सवात हे सर्व काही मिळवू या.

**- डॉ. वसंतराव लवंगे, नरखेड.**

## टुडेज् ब्लॉग

# चेहराच ठरणार कळीचा मुद्दा



महाराष्ट्र विधानसभा निवडणूक अनेक अर्थाने वेगळी राहणार आहे. महाविकास आघाडी आणि महायुती या दोन प्रमुख आघाड्यांमध्ये ही निवडणूक होत असल्याचे चित्र आहे. अनेक दशकानंतर विधानसभेच्या निवडणुकीची उत्सुकता सर्वसामान्य मतदारांपासून अपक्ष आमदार, छोट्या छोट्या पक्षांचे नेते, कार्यकर्ते, विविध आंदोलनकर्ते, प्रादेशिक पक्षांचे नेतृत्व, राष्ट्रीय पक्षांच्या राष्ट्रीय नेतृत्वाला आहे. कारण महाराष्ट्राची यंदाची निवडणूक ही ऐतिहासिक आहे. कदाचित इतिहासात प्रथमच अशी निवडणूक होत आहे, ज्यात जो पक्ष सत्ताधारी आहे, त्यांचाच एक गट विरोधी पक्षातही आहे.

लोकसभेत बसलेला फटका विधानसभेत बसू नये साठी संघ 'दक्ष' झाला आहे. जागावाटपापासून निवडणूक रणनीतीपर्यंत संघाचे स्वयंसेवक, प्रचारक आणि वरिष्ठ पातळीवरील नेते आता मैदानात उतरून काम करणार असल्याची तयारी त्यांनी दाखवली आहे. त्यासाठी अट एकच ठेवली आहे, बिहार पॅटर्न महाराष्ट्रात नको. भाजपचे १०५ आमदार असून त्यांना उपमुख्यमंत्रिपद मिळाले आहे.

२०१४च्या विधानसभा निवडणूक प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार घोषित केले होते. केंद्रात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र ही घोषणा त्यातूनच पुढे आली होती. याच घोषणेला आव्हान देणारी एक जाहिरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मध्यंतरीच्या काळात दिली होती. तेव्हा देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यातील शीतयुद्धही महाराष्ट्राने पाहिले. तेव्हा या निवडणुकीनंतर मुख्यमंत्रिपद कळीचा मुद्दा असणार आहे.

सध्या मात्र महायुतीतील अजित पवारांनी स्पष्ट केले आहे की आमचा मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार निवडणुकीनंतर ठरेल. त्यामुळे ज्यांच्या जागा जास्त त्यांचा मुख्यमंत्री हेच तत्त्व महायुतीत राबवलं जाणार असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे १५० जागा लढवल्यानंतर जर वातावरण अनुकूल झाले तर सर्वाधिक जागा कोणाच्या असणार हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही. महाविकास आघाडीतही सर्वकाही अनुकूल असताना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा आधीच जाहीर करा असा राग उद्धव ठाकरेंनी आळवला आहे. त्यासाठी त्यांनी दिलेले कारण हे त्यांच्या पूर्वानुभवावर आधारित आहे. 'ज्यांच्या जागा जास्त त्यांचा मुख्यमंत्री' या तत्त्वाने लढलो तर गेल्या २५-३० वर्षांचा भाजपसोबत आमचा अनुभव वाईट राहिलेला आहे. भाजप आमचेच उमेदवार पाडण्यासाठी लढत होती, हे उदाहरण त्यांनी दिले. पण काँग्रेस आणि शरद पवार यासाठी तयार नाहीत.

पवारांनी पुण्यात आणि परवा कोल्हापुरातही स्पष्ट केले की मुख्यमंत्री कोण होणार हे महत्त्वाचे नाही. सत्ता परिवर्तन करून जनतेच्या हिताचे निर्णय घेणारं राज्य निर्माण करणे हेच आमचे ध्येय आहे. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करून लढण्याची काँग्रेसमध्ये सहसा परंपरा राहिलेली नाही. त्यांच्याकडे मुख्यमंत्री पदासाठीचे अनेक चेहरे आहेत, त्यासोबतच सुशीलकुमार शिंदे यांचा चेहरा पुढे करून लढले आणि सत्ता आल्यानंतर विलासरावांना संधी दिली गेली. तर पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारखा वरून लादलेलाही मुख्यमंत्री येऊ शकतो, हेही त्यांनी दाखवून दिले आहे.

आगामी विधानसभा निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडी यांच्याकडून मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर न होताच होण्याची शक्यता अधिक असली तरी मुख्यमंत्रिपदासाठी निवडणुकीनंतर महायुती आणि महाविकास आघाडी फुटणार नाही, याची शाश्वती कोणीच देऊ शकत नाही, हेही तेवढंच खरं आहे.

**- उन्मेष खंडाळे.**

## जन्म हा अखेरचा



### स्वपराज्ञस्थल, भावाभावलयस्थल स्वपराज्ञस्थल

व्यवहारात अनुकूल व्यक्तीबरोबर संयोग झाला तर मनुष्याला सुखानुभव येतो, प्रतिकूल व्यक्तीबरोबर संयोग झाला तर दुःखानुभव येतो. याच्या उलट अनुकूल व्यक्तीचा वियोग दु:खदायक तर प्रतिकूल व्यक्तीचा वियोग सुखदायक ठरतो. अशाप्रकारे संयोग आणि वियोग हे दोन्हीही सुखदायक व दु:खदायक ठरत असतात. परंतु भेदभावशून्य अशा स्थितीत कोणाचा कोणाशी संयोग होत नाही की वियोग होत नाही. या अवस्थेत ज्ञेय आणि ज्ञाता असा भेद देखील उरत नाही. परमात्मा हे ज्ञेय आणि जीवात्मा हा ज्ञाता अशी भावनाच येथे शिल्लक राहत नाही. **न बन्धो न च मुक्तिश्च न देवाद्यभिमानिता। न सुखं नैव दु:खं च नाज्ञानं ज्ञानमेव वा।। २०.५०।। (क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

**येथे एकची लीला तरले । जे सर्व भावे मज भजले ।। ते ऐलीच थडी सरले । मायाजाळ ।। (ज्ञानेश्वरी) असे काही संतपुरुष (महात्मे) असतात जे सर्वांगाने आणि सर्व भावाने सर्वो त्तमाचे सेवेत सदैव रमतात आणि काही जे जे सर्व । कायीक, वाचीक व मानसिक भाव । ते मी वाचूनी धाव । आणिक नाही ।**

अशी ज्यांची उपासना साधना असते ते संत पुरुषच असतात. 'जगतामध्ये आध्यात्मिक साधनेची परंपरा वर्धिष्णु व्हावी यासाठी त्यांचा जन्म असतो. **केला जगासी उपकार । तारियले नारी नर ।।** हेच त्यांचे कार्य असते. साक्षात्काराच्या मार्गे आत्मोद्धार आणि लोकोपकारातून लोकोद्धार अशी त्यांची कार्यसिध्दी असते. जुन्या काळात सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील नरखेड गांवी

# वै. हभप वैद्य ग. म. लवंगे ११०वी जयंती

वै. ग. म. लवंगे हे संतपुरुष होऊन गेले. यांचा आदराने व गौरवाने उल्लेख करावा लागेल. (जीवन काल १९१४ ते २०००) वै. गणपतराव लवंगे हे नरखेड, तालुका मोहोळ, जि. सोलापूर या गावचे रहिवाशी ते एक निष्णात आयुर्वेदाचार्य होऊन गेले.



नाडीवरुन ते निष्णात रोगाचे अचूक निदान करीत नरखेडचे वै. ग. म. लवंगे हे केवळ वैद्यच नव्हते तर ते प्रवचनकार होते. संत वाङ्मयाचा त्यांचा चांगलाच अभ्यास होता. दरवर्षी त्यांचा वाढदिवस साजरा करण्याकरता सोलापूरहून संचारचे संपादक कै. रंगाअण्णा वैद्य आवर्जून उपस्थित राहत होते. आपल्या व्यवसायात लौकिक तर मिळकतीच परंतु संतविचार प्रस्तृत करण्याचे अनेक ठिकाणी त्यांनी किर्तने, प्रवचने केलीत. त्यांची तळमळ वाखाणण्यासारखी होती. रुग्णांची सेवा हा तर त्यांचा धर्मच होता. त्यांचे पूर्ण घराणे सुशिक्षित व सुसंस्कृत आहे. त्यांनी लावलेल्या वटवृक्षांच्या सावलीत त्यांची मुले-मुली व नातवंडे, परतुंडे खेळतात. हा प्रेमाचा वटवृक्ष त्यांच्या सर्व मुलांनी कधीही उमलू दिला नाही. त्यांच्या मागे त्यांचे धाकटे चि. डॉ. वसंतराव लवंगे करतात. त्यांचे नातू डॉ. राज वसंतराव लवंगे व डॉ. श्रेयश सोमनाथ लवंगे तसेच डॉ. उमेश मेंडगुळे हे आयुर्वेदाचार्य झाले आहेत. डॉ. श्रेयश लवंगे हे एमबीबीएस असून ते एमडी करत आहेत.

मौजे नरखेड येथून पंढरपूरला जाणाऱ्या २० दिंड्या असून त्या दिंड्यास कै. वैद्य ग. म. लवंगे यांच्या स्मरणार्थ मोफत औषधे दिली जातात. तसेच माघी यात्रेला हभप औसेकर महाराज यांची दिंडी नरखेड मुक्कामी असहे. ७ ते ८ हजार वारकरी दिंडीत असतात. त्या सर्व वारकऱ्यांना मोफत औषधे दिली जातात. त्यांचा जन्म गणेश चतुर्थीच्या दिवशीच झाला होता. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी नेत्रशिबिर घेतले जाते. आजपावेतो ४०० ते ५०० लोकांना दृष्टी देण्यात आली आहे. त्यांच्या ११०व्या जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**- शीतल पाटील, सांगोला, जि. सोलापूर.**

# कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा उपक्रम : मुख्यमंत्री योजनादूत

महाराष्ट्र शासन राज्यातील नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. या लोक कल्याणकारी योजनांचे प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने 'शासन आपल्या दारी' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात सुरू केलेला होता. या उपक्रमाच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या दारापर्यंत जाऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत होता. या अंतर्गत राज्यातील लाखो नागरिकांना विविध शासकीय योजनांचा एका छताखाली लाभ देण्यात शासन यशस्वी झाले होते. याच उपक्रमाचा विस्तार म्हणजे मुख्यमंत्री योजना दूत असून याचा मुख्य उद्देश सामाजिक बदल घडविण्यासाठी उत्सुक असलेल्या ५० हजार उत्साही तरुणांच्या समर्पित प्रयत्नाद्वारे जनतेपर्यंत पोहोचणे हा आहे. कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा उपक्रम म्हणजेच मुख्यमंत्री योजनादूत होय.

**कार्यक्रमाची रूपरेषा :** १) महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रम राबविला जाणार आहे. राज्यात कार्यरत प्रशासकीय यंत्रणेला मदत करण्याकरिता मुख्यमंत्री योजनादूत नेमले जातील. २) ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १ व शहरी भागात ५००० हजार लोकसंख्येसाठी १ योजनादूत या प्रमाणात एकूण ५० हजार योजनादूतांची निवड करण्यात येईल. ३) मुख्यमंत्री योजनादूतास प्रत्येकी १०,००० प्रती महिना एवढे ठोक मानधन देण्यात येईल. (प्रवास खर्च, सर्व भत्ते समावेशित) ४) निवड झालेल्या मुख्यमंत्री योजनादूतासोबत ६ महिन्यांचा करार केला जाईल व हा करार कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नाही.

**उमेदवारास होणारे फायदे-** प्रत्यक्ष कामाचा अनुभव. सामाजिक बदलाचा भाग होण्याची संधी. विद्या वेतनातून युवकांना आर्थिक सहाय्य. शिकण्याबरोबरच कौशल्य विकास. सरकारी कामकाजाचा अनुभव.

**मुख्यमंत्री योजनादूतांची नेमणूक प्रक्रिया:-** १) उमेदवारांच्या नोंदणीची व प्राप्त अर्जाच्या छाननीची प्रक्रिया माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे नियुक्त करण्यात बाह्यसंस्थांमार्फत ऑनलाईनरीत्या पूर्ण करण्यात येईल. २) ऑनलाईनरीत्या प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी राज्यातील प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येईल. जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने, प्राप्त अर्जाशी संबंधित उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करतील जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने संबंधित जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १/शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ या प्रमाणात उमेदवारांना योजनादूत म्हणून पाठवतील. मुख्यमंत्री योजनादूत या कार्यक्रमांतर्गत उमेदवारांना सोपविण्यात येणारे कामकाज हे शासकीय सेवा म्हणून समजण्यात येणार नाही. सबब, या नेमणुकींच्या आधारे भविष्यात शासकीय सेवेत नियुक्तीची मागणी अथवा हक्क सांगितला जाणार नाही याबाबतचे हमीपत्र निवड झालेल्या उमेदवाराकडून घेण्यात यावे.

**निवड झालेल्या योजनादूताने करावयाची कामे :** १) योजनादूत संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्या संपर्कात राहून जिल्ह्यातील योजनांची माहिती घेतील. २) प्रशिक्षित योजनादूतांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जाऊन त्यांना ठरवून दिलेले काम पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. ३) योजनादूत राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रचार आणि प्रसिद्धी करताना ग्राम पातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून शासनाच्या यो.

**सुमारे ५० हजार योजनादूतांची भरती-**

मुख्यमंत्री योजना दूध अंतर्गत माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने राज्यभरात सुमारे ५० हजार योजनादूत पदांची सहा महिन्यासाठी भरती केली जाणार आहे. या योजने अंतर्गत प्रत्येक योजना दूत ला प्रतिमहा दहा हजार रुपये मानधन देण्यात येणार असून राज्याच्या कौशल्य विकास नाविन्यता रोजगार विभागाच्या वतीने हे मानधन निवड झालेल्या उमेदवाराच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे.

राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी(२७,८३४), प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी(५३८३) एक तर महानगरपालिकेच्या १२९६ वार्डसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे राज्यात एकूण ४७ हजार ५१६ योजना दूत ची निवड केली जाणार आहे. म्हणजे शहरी भागात १९ हजार ६८२ व ग्रामीण भागात २७ हजार ८३४ योजना दूत लवकरच निवडले जाणार आहेत.

याप्रमाणे राज्य शासन प्रत्येक ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रात मुख्यमंत्री योजनादूतांची नेमणूक करून शासकीय योजनांचा प्रचार व प्रसार करणार आहे. या पन्नास हजार योजनादूतांना जिल्हास्तर तसेच उपविभाग स्तरावर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून हे योजनादूत कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा दुवा ठरतील व प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील याची खात्री वाटते.

**- सुनील सोनटक्के,**
**जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/०९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.

अस्सल सोलापुरी
सुराज्य सोलापूर

## ऑस्ट्रेलियाच्या जॉस इंगलिसने ४३ चेंडूत झळकावले विक्रमी शतक

**लंडन :** ऑस्ट्रेलियाचा स्फोटक यष्टीरक्षक-फलंदाज जोश इंगलिसने स्कॉटलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात अवघ्या ४३ चेंडूत शतक झळकावले. यासह, तो आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये ऑस्ट्रेलियासाठी सर्वात जलद शतक झळकावणारा फलंदाज बनला. त्याने एरॉन फिंच आणि ग्लेन मॅक्सवेल यांचा विक्रम मोडला, ज्यांनी प्रत्येकी ४७ चेंडूत शतके झळकावली होती. इंगलिसचे टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हे दुसरे शतक आहे.

शुक्रवारी ६ सप्टेंबर रोजी एडिनबर्ग येथे झालेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी केली. यष्टिरक्षक-फलंदाज जोश इंगलिसने फार वेळ न घालवता जबाबदारी स्वीकारली आणि आक्रमण सुरु केले. यादरम्यान इंगलिसने अवघ्या २० चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. १८व्या षटकात आपले शतक पूर्ण केले. त्याने सलग २ षटकारांसह अवघ्या ४३ चेंडूत दुसरे टी-२० आंतरराष्ट्रीय शतक पूर्ण केले. त्याने अवघ्या ४९ चेंडूत १०३ धावा केल्या, त्यापैकी ७० धावा ७ चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने केल्या. इंगलिसच्या या उत्कृष्ट शतकानंतरही ऑस्ट्रेलियन संघाला २० षटकांत १९६ धावा करता आल्या.



# सोलापूरबद्दल बाहेरचे मुरडताहेत आता नाक-डोळे
# ‘स्मार्ट सिटी’च्या अर्थव्यवस्थेलाच कोट्यवधींचा ‘ब्रेक’

## ▸▸ एमएच १३ वगळा अन्य नंबर प्लेटची गाडी दिसली की कारवाईसाठी सरसावतात ‘यांचे’ हात

## ▸▸ सोलापूरची प्रतिमा डागाळणाऱ्या आरटीओ अन् वाहतूक पोलिसांचे कारनामे थांबणार कधी?



**सोलापूर/खास प्रतिनिधी**

**मेडिकल अन् एज्युकेशन हब नंतर धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून उत्तुंग झेप घेत असलेल्या स्मार्ट सिटी सोलापूरबद्दल परराज्यासह परदेशातील पाहुणे तसेच उद्योजक यांची भूमिका नकारात्मक होत आहे. इथं आल्यानंतर मुख्यत्वे, आरटीओ आणि वाहतूक नियंत्रण पोलीस यांच्याकडून जो त्रास अन् छळवाद होतोय त्यावरुन या संबंधितांकडून सोलापूरबद्दल आता नाकं मुरडली जात आहेत. सोलापूरला पर्यटनासाठी पुन्हा येणं शिवाय इथं उद्योग उभारणं याबद्दल त्यांची मानसिकता तयार होत नाही. याचा फटका सोलापूर शहर अन् जिल्ह्याला अर्थकारणाला बसत असून या जिल्ह्याच्या स्थानिक अर्थकारणाला ब्रेक बसत आहे.**

विशेषत्वे, एमएच १३ वगळा अन्य नंबरची गाडी प्लेट दिसली की कारवाईसाठी आरटीओ आणि वाहतूक पोलीस यांचे हात कारवाईसाठी सरसावतात. यातून सोलापूरची प्रतिमा डागाळत आहे. आरटीओ अन् वाहतूक पोलिसांचे बाहेरच्या गाड्यावाल्यांकडून वसूली करण्याचे कारनामे थांबणार कधी? हा अत्यंत महत्त्वाचा आणि ‘कळी’चा मुद्दा आहे.

आरटीओ आणि पोलीस यांच्या दररोजच्या कारवायांच्या सत्रामुळं सोलापूर शहर-जिल्ह्यात येण्याला पर्यटक किंवा उद्योजक येण्याला धजावेनात त्यातून त्यांची संख्या रोडावली आहे. त्याचा थेट परिणाम बाहेरचा पैसा सोलापुरात येण्यावर होत असून इथली अर्थव्यवस्था अधिकाधिक मजबूत होण्यावर मोठ्या मर्यादा पडत आहेत.

विविध देशांसह राज्यांमधून सोलापूर शहर जिल्ह्यात पर्यटक तसेच उद्योजक येत असतात. तथापि शहर-जिल्ह्यात प्रवेश करताना अनेक ठिकाणी आरटीओ आणि वाहतूक नियंत्रक पोलीस हे तपासणीच्या नावाखाली एमएच १३ वगळता अन्य पासिंगची प्रत्येक गाडी अडवून चालान भरण्याची कारवाई करीत आहेत. या कारवाईला बाहेरुन येणारे संबंधितजण वैतागत आहेत. कारवायांना सामारे जाणाऱ्या बहुतांशजणांनी सोलापूरला येण्याबद्दल हात जोडले आहेत.

दरम्यान परिणामी सोलापूर शहर-जिल्ह्यातील हॉटेल्स, लॉजेस्, पर्यटन केंद्रे, वाहतूक व्यवसाय, चादर, टॉवेल, बेडशीटस् यासह अन्य वस्तुंची विक्री यावर मोठा परिणाम जाणवत आहे. यातून सोलापूर जिल्ह्याचं वर्षाला कोट्यवधींचं नुकसान होत आहे. रोजगार आणि अर्थव्यवस्थेला फटका बसत आहे.

### प्रगतीला आडफाटा ठरणारं कसलं प्रशासन?

सोलापूरचे नाव देशभरात प्रसिद्ध असताना या गैर-कारवायांमुळे शहराचा विकास रोखला जात आहे. बाहेरून येणाऱ्या पर्यटकांची संख्या घटल्यामुळे स्थानिक व्यापारी अस्वस्थ आहेत.शहराच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेली आर्थिक मदत कमी होत आहे. वाहतूक विभाग आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाने तातडीने या प्रश्नावर उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे, अन्यथा शहराचे पर्यटन क्षेत्र आणि स्थानिक अर्थव्यवस्था आणखी मोठ्या संकटात सापडेल. सोलापूरच्या नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी या चुकीच्या चालानविरोधात आवाज उठवण्याची गरज आहे, जेणेकरून सोलापूरचे नाव आणि प्रतिमा पुन्हा उंचावू शकेल.

### लोकप्रतिनिधींना नाही का कसलेच सोयरसूतक?

वास्तविक पाहता सोलापूर शहर-जिल्ह्यातील जनतेनं आपल्या शहर-जिल्ह्याच्या विकासासाठी आपले प्रतिनिधी म्हणून खासदार आणि आमदार निवडून दिले. या संबंधितांकडून विकासाचा मुद्दा हाताळला जाणं अपेक्षित आहे. नैतिकता म्हणून सर्वच लोकप्रतिनिधींनी विकासाचं पाहिला हवं. तथापि, आरटीओ आणि वाहतूक नियंत्रक पोलिस यांच्या कारवायांमुळे पर्यटक आणि उद्योजक सोलापूर येण्याला कोणी धजावेना झालेत. त्याचा थेट परिणाम इथल्या छोट्या-मोठ्या व्यावसायांसह अर्थव्यवस्थेवर पर्यायाने रोजगारावर होत आहे. तरीपण लोकप्रतिनिधी याप्रकरणाकडे कोणीच लक्ष द्यायला तयार नाही. लोकप्रतिनिधींला सोलापूरच्या अर्थव्यवस्थेबद्दल तसेच उद्योग आणि रोजगाराबद्दल कसलेच सोयरसुतक नाही का, हा मुद्दा उपस्थित केला जात आहे.

### तक्रारींना केराची टोपली; कारवाईचा ससेमिरा मात्र अखंडपणे चालूच

सोलापूरमधील अनेक सजग नागरिक आणि स्थानिक व्यावसायिकांनी याबाबत पोलिस प्रशासनाकडे आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. मात्र, या तक्रारींना अद्याप कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. उलट, गैर-चालान लावण्याचे प्रकार अधिकच वाढले आहेत. या कारवायांमुळे संपूर्ण शहराची प्रतिमा नकारात्मक होत आहे, आणि याचा थेट परिणाम स्थानिक पर्यटन आणि उद्योगांवर होत आहे.



सजग नागरिकांसह व्यापाऱ्यांनी केलेल्या तक्रारींना अद्याप कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. उलट, गैर-चालान लावण्याचे प्रकार दिवसेंदिवस अधिकच वाढले आहेत. या कारवायांमुळे संपूर्ण शहराची प्रतिमा नकारात्मक होत आहे, आणि याचा थेट परिणाम स्थानिक पर्यटन आणि उद्योगांवर होत आहे.

**-कुंदन जाधव, अध्यक्ष, गिरिकर्णिका फाऊंडेशन आणि सदस्य, सोलापूर विकास मंच**



सोलापूर जिल्हा हा धार्मिक पर्यटन हब होत आहे, ही सुखावणारी बाब असली तरी पर्यटक आणि उद्योजक, व्यावसायिक यांची संख्या वाहतूक पोलीस आणि आरटीओ यांच्या कारवांशिवाय अन्य कारणांमुळे कमी होत आहे. सोलापूरची प्रतिमा डागाळली जात आहे. यामध्ये बदल होण्याची गरज आहे. पर्यटन आणि उद्योग वाढले तरच सोलापूरचे अर्थकारण वाढणार आहे, अन्यथा स्मार्ट सिटी सोलापूर हे पेन्शरांचे शहर होईल.

**-केतन शहा, उद्योजक, सोलापूर**



कारवाईदरम्यान आरटीओ कार्यालयाच्या संबंधितांनी चुकीचे चालान फाडले असेल तर त्याला कोर्टात चॅलेज करता येईल. उलट चालन फाडण्याने थेट पैसे घेणे वगैरे ज्या काही अवैध गोष्टी होतात त्या होत नाहीत. त्यामुळे चालान फाडणे हे वाहनचालकांच्या दृष्टीने योग्य आहे. विनाकारण चालन फाडण्याचे प्रकार आरटीओ कार्यालयाच्यासंबंधितांकडून होत नाहीत. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई होते. परराज्याची नंबर प्लेट पाहुन कारवाई होत नाही.

**-गजानन नेरपगार, प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर**



नियम तोडणाऱ्या वाहनांवरच कारवाया करण्यासबंधी संबंधितांना सुचना दिल्या आहेत, त्याप्रमाणे कार्यवाही होत आहे. एमएच १३ पासिंगच्या गाड्यांना सवलत देण्याचा प्रकार नाही. कोणत्याही राज्यातून येत असलेल्या गाड्या विनाकारण अडवू नका, अशा सक्त सुचना देण्यात आल्या आहेत, त्यामुळे गैर चालान फाडण्याचे प्रकार रोखले गेले आहेत. चालान फाडण्यासंबंधीच्या काही तक्रार प्राप्त झाल्या होत्या. गुरुपोर्णिमेदरम्यान असे काही प्रकार झाल्याचे निर्दशनास आले होते. मात्र तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे.

**- सुधीर खेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक), सोलापूर**

## तरुणास सातजणांनी मिळून केली मारहाण

**सोलापूर :** उमरड गावात प्रेम संबंधातून परशु घनवट व बाळू घनवट व इतर पाच जणांनी मिळून मारहाण केल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात दिलीप पांडुरंग शिंदे (वय-४६, रा. उमरड, तालुका करमाळा) हे जखमी झाले. करमाळा येथे उपचार करून पुढील उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे भाऊ रेवण शिंदे यांनी दाखल केले.

### दुचाकी स्लिप होऊन तरुण जखमी

तुळजापूर ते सोलापूर येत असताना हगलूर गावाजवळ दुचाकी स्लीप होऊन पडल्याने वीस वर्षीय तरुण जखमी झाल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात महेश शर्मा (वय २० रा. हिप्परगा) हा जखमी झाला. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे मदतनीस तुकाराम बंडगर यांनी दाखल केले.

### दारूच्या नशेत पडल्याने वृद्ध जखमी

घरी कट्ट्यावरून दारूच्या नशेत खाली पडल्याने चेहऱ्यास व डोळ्यास मार लागून जखमी झाल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात करबसप्पा इराण्णा मुनोळी (वय ६९, रा. अक्कलकोट) हे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हिलमध्ये मुलगा विजय मुनोळी यांनी दाखल केले.

## गुजरातच्या माजी मंत्र्यांकडे पिंपरी-चिंचवडची जबाबदारी

**पुणे :** अजित पवार यांचा एकेकाळी बालेकिल्ला मानला जात असलेल्या पिंपरी-चिंचवडवर भाजपने लक्ष घातले आहे. गुजरातचे माजी गृहमंत्री प्रदीपसिंग जडेजा यांच्याकडे शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघाची प्रवासी प्रभारी नेता म्हणून भाजपने जबाबदारी सोपविली आहे. चिंचवड आणि भोसरी भाजपकडे कायम राहण्याची चिन्हे आहेत. भाजपने विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरु केली आहे. तिन्ही विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी असलेले गुजरातचे माजी गृहमंत्री प्रदीपसिंग जडेजा यांनी शहरात येत आढावा घेतला.

## जि.प. प्राथमिक शिक्षक पुरस्कार

# प्रसिद्धी न देताच घाई गडबडीत केले वितरण

## शिक्षकांनी व्यक्त केली नाराजी

**सोलापूर/प्रतिनिधी**

जि.प. प्राथमिक शिक्षकांच्या पुरस्काराला प्रसिद्धी न देताच कार्यक्रम गडबडीत पार पाडल्याने आमदार खासदार किंवा पालकमंत्री यापैकी कोणीही महत्त्वाची व्यक्ती कार्यक्रमाला उपस्थित न राहिल्याने प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्याचा कारभार चव्हाट्यावर आल्याचे गुरुवारी दिसून आले. यामुळे अनेक शिक्षक नाराज झाल्याचे दिसले.



प्रसिद्धी न देताच शिक्षक पुरस्कारासारखा उत्तम कार्यक्रम गडबडीत उरकल्याने अनेक शिक्षकांनी नाराजी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या एकदिवस अगोदर सगळ्यांना निमंत्रण देण्यात आले. सोलापूर जिल्ह्यातील आमदार आणि खासदारांना बुधवारी नियोजन पत्रिका दिली गेली. यामध्येच यांचे फसलेले नियोजन दिसून येते.

शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाला सोलापूर जिल्हा परिषदेच्या उत्कृष्ट कार्य केलेल्या शिक्षकांना पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार देताना पालकमंत्री, किंवा कुठल्याही पत्रकारांन कळवले नाही.

ज्येष्ठ खासदार किंवा आमदारांच्या हस्ते जर हा पुरस्कार मिळाला असता तर त्याला अधिक महत्त्व प्राप्त झाले असते. पण शिक्षकांचा पुरस्कार घेताना हिरमोड झाला.

शेवटी नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी हा कार्यक्रम स्वतः हाती घेत बारगळलेल्या कार्यक्रमाला शोभा आणली . त्यांनी उपस्थितीते शिक्षकांमध्ये चैतन्य वाढवले. व त्यांच्याच हातून या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

येथे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर श्शेख हे कमी पडल्याचे दिसून आले. आपल्या भाषणामध्ये त्यांनी उत्कृष्ट कार्य केलेल्या आणि पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे अभिनंदन केले. यापुढे जिल्हा परिषदेच्या शाळांची गुणवत्ता वाढवण्यासह विद्यार्थ्यांचा कलागुणांना वाव देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.





वेळापूर : सुवर्ण संकल्प स्पोर्टच्या यशस्वी विद्यार्थ्यांसह राष्ट्रीय प्रशिक्षक अक्षय राऊत.

## जिल्हास्तरीय शालेय शुटिंग स्पर्धेत सुवर्ण संकल्प स्पोर्ट्स क्लबचे यश

वेळापूर/प्रतिनिधी

अकलूज (ता. माळशिरस) येथे इंद्रधनुष्य स्पोटर्स् क्लबच्यावतीने सोलापूर जिल्हास्तरीय शालेय शूटिंग स्पर्धा झाल्या. त्यात वेळापूर येथील सुवर्ण संकल्प स्पोर्ट्स शूटिंग क्लबच्या १५ विद्यार्थ्यांनी ११ पदकांची कमाई केली.

सुवर्णपदक विजेते-नंदिनी सर्वगोड, सिद्धी राऊत, प्रथमेश बनसोडे, शहानुर शेख, मैत्रेय कांबळे. रजत पदक विजेते-: रेहान शेख, राजवीर साठे, वैष्णवी बाबर, दीक्षा बुचडे. कास्यपदक विजेते-: शिवतेज मगर, पृथ्वीराज राऊत. यशस्वी स्पर्धकांची पुणे विभागीय स्पर्धसाठी निवड झाली आहे.

यशस्वी विद्यार्थांना राष्ट्रीय प्रशिक्षक अक्षय राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे माजी जि.प. सदस्य सतीश माने देशमुख, माजी उपसरपंच शंकर काकूळे, ग्रामपंचायत सदस्य दीपक राऊत, तुकाराम राऊत, ॲड. दत्तात्रेय राऊत, ॲड. रामचंद्र ताटे यांनी अभिनंदन केले.

# विधानसभेच्या तयारीला लागा

## खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांची कार्यकर्त्यांना सूचना


### ● स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

वेळापूर/प्रतिनिधी

माळशिरस तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी येत्या विधानसभेच्या तयारीला लागावे. लोकसभेत कोठे कमी पडलो, याचा अभ्यास करुन कामाला लागा, अशा सूचना खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनी कार्यकर्त्यांना दिल्या.

पिसेवाडी ग्रामपंचायत कार्यालय येथे उत्तमराव जानकर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते साहिल आतार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुक्रवारी (दि. ६) राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला, याप्रसंगी ते बोलत होते.

येत्या विधानसभेला ठरलेल्याप्रमाणे चेअरमन उत्तमराव जानकर यांना आमदार करायचे आहे. त्या दृष्टिकोनातून सर्व कार्यकर्त्यांनी जोरात काम करायचे आहे. त्याचबरोबर स्वाभिमानी शेतकरी संघटनेतून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आलेले साहिल आतार यांनी पूर्वीप्रमाणेच येथेही पक्षाचे जोरदार काम करावे, असेही खा. धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले. पक्षाचे नेते उत्तमराव जानकर यांनीही कार्यकर्त्यांना जल्लोष निर्माण करणारे भाषण करण्यात आले. रवींद्र पाटील यांनीही विचार व्यक्त केले.



वेळापूर : पिसेवाडी येथे साहिल आतार आणि कार्यकर्त्यांनी खा. धैर्यशील मोहिते-पाटील व नेते उत्तमराव जानकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये प्रवेश केला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष किसान सेल प्रदेश कार्याध्यक्ष कमलाकर माने देशमुख, किसान सेल प्रदेश सरचिटणीस मदनसिंह जाधव, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष अरुण तोडकर, भानुदास सालगुडे, माजी पं. स. सदस्य अजय सकट, पिसेवाडी सरपंच मोहन भाकरे, पैलवान दत्ता मगर, ओबीसी सेल तालुकाध्यक्ष सोमनाथ पिसे, साजिद सय्यद, वेळापूर माजी उपसरपंच जावेद मुलाणी, डॉ. धनंजय मेहत्रे यांच्यासह माळशिरस तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मान्यवर, पिसेवाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

पक्षप्रवेशाप्रसंगी खा. धैर्यशील मोहिते-पाटील व उत्तमराव जानकर यांचा पिसेवाडी ग्रामस्थांकडून नागरी सत्कार करण्यात आला.

साहिल आतार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेल तालुका कार्याध्यक्षपदी नियुक्तीचे पत्र खा. धैर्यशील मोहित-पाटील यांच्या हस्ते साहिल आतार यांना देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोमनाथ पिसे यांनी केले.

#### ... तोपर्यंत बाहेरचा खासदार नाही : जानकर

माळशिरस तालुक्यातील मोहिते-पाटील गट आणि उत्तमराव जानकर गटांनी एकदिलाने काम करावे. जोपर्यंत आपला तालुका मजबूत आहे, तालुका गड आहे, तोपर्यंत येथे दुसरा खासदार होऊ शकत नाही. म्हणून दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी या तालुक्यातील वातावरण हे कायम अबाधित राहिले पाहिजे.



माळीनगर : रोटरी क्लबच्यावतीने श्री जयसिंह मोहिते-पाटील विद्यालयातील शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

## मोहिते-पाटील विद्यालयातील शिक्षकांचा रोटरी क्लबतर्फे सत्कार

माळीनगर/प्रतिनिधी

रोटरी क्लब अकलूज यांच्यावतीने श्री जयसिंह मोहिते-पाटील विद्यालय संग्रामनगर शाळेत शिक्षकदिन साजरा करण्यात आला. यावेळी रोटरी क्लब अकलूजचे उपाध्यक्ष नवनाथ नागणे, संचालक बबनराव शेंडगे, अजित वीर, आशिष गांधी, गोमटेश दोशी, दिपक फडे, केतन बोरावके, सुवर्णा शेंडगे, मुख्याध्यापक मल्हारी घुले, प्राथ. विभाग मुख्याध्यापक गणेश करडे आदी उपस्थित होते. यावेळी रोटरी क्लब अकलूज यांच्यावतीने सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. संचालक बबनराव शेंडगे यांनी रोटरी क्लबच्या कार्यपद्धतीची माहिती दिली.

शाळेतील विद्यार्थी अविष्कार खरात, आनम शेख, लक्ष्मी आयवळे, निशा खरे यांनी भाषणे केली प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश करडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन संयोगिता माने, वैष्णवी पवार यांनी केले. वैशाली कांबळे यांनी आभार मानले.

## हिरजच्या सरपंचपदी प्रशांत साबळे

उत्तर सोलापूर : हिरजच्या (ता. उत्तर सोलापूर) सरपंचपदी प्रशांत साबळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी मंडळ अधिकारी माने, सचिव, ग्रामसेवक प्रतापसिंह भोई यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवडीसाठी ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात आली. यावेळी माजी सरपंच बद्रीनाथ नागटिळक, इलाही पटेल, उपसरपंच- गंगूबाई तमशेट्टी, ग्रामपंचायत सदस्य दिलीप रुपनर, गणपत कांबळे, सुनीता बसवंती, गीता लिंबोळे, राणी येलगुंडे, सखुबाई साठे, सुरेखा माळी उपस्थित होते.

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर (संगणक विभाग)

ई निविदा सूचना क्रं. ३-२०२४/२५

जाहीर प्रसिद्धीकरण

सोलापूर महानगरपालिकेच्या संगणक विभाग कार्यालयातर्फे सुशोभिकरण करण्यात आलेल्या शहरातील ५ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेकामी "ई-निविदा मागविणेत येत आहेत."

Tender ID - 2024_SMC_1080652_1

या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.०५-०९-२०२४ सकाळी १० वाजलेपासून पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
उपआयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे उंबर्गे, ता. बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने आमचे खालील सही करणारे पक्षकार पद्माकर सत्यवान कदम, रा. उंबर्गे ता. बार्शी कळवू इच्छितात की,

डि. सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे उंबर्गे येथील शेतजमीन गट नं. २३४ याचे संपूर्ण क्षेत्र २ हे. २३ आर + पो.ख.० हे.०१ आर एकूण २ हे.२४ आर आकार २ रु.५९ पैसे आहे या जमिनीपैकी दक्षिण बाजूची जमीन क्षेत्र ० हे.५५ आर आकार ० रु.६५ पैसे यासी चतु:सिमा **पुर्वेस**-वालचंद्र मुंढे यांची जमीन, **दक्षिणेस**- वसंत विधाते यांची जमीन, **पश्चिमेस**- मच्छिंद्र विधाते यांची जमीन **उत्तरेस**- सदर गट नंबरपैकी जालींदर विधाते यांची जमीन येणेप्रमाणे जमीन आतील तदंगभूत वस्तुसह.

वर नमूद मिळकत ही राणी विलासराव पाटील यांचे मालकी कबजे वहिवाटीची होती सदर जमीन त्यांनी आमचे पक्षकारास कायम खरेदी देण्याचे ठरवून इसाराची रक्कम स्विकारुन आमचे पक्षकाराचे हक्कात साठेखताचा दस्त नोंदवून दिलेला आहे. पुढे जाता सदर राणी पाटील यांचे मनात स्वार्थबुध्दी निर्माण झालेने त्यांनी बार्शी न्यायालयात रे.मु.नं. २४३/२०२४ चा दाखल केला असून त्याकामी आमचे पक्षकाराने हजर होवून कैफियत, म्हणणे सोबत साठेखतावरुन खरेदीखत मिळणेकरीता व त्रयस्थ व्यक्तीचे हक्क हितसंबंध निर्माण करु नयेत म्हणून प्रतिदावा व ताकीदीचा अर्ज दिलेला आहे. प्रकरणी वर नमूद मिळकत न्यायप्रविष्ठ असतानाही सदर राणी विलासराव पाटील या सदर मिळकत हस्तांतर वा कर्जबोजा निर्माण करण्याचे प्रयत्नात असलेचे आमचे पक्षकारास समजून आलेले आहे तसे झालेस ते कृत्य न्यायालयीन कामकाजात हस्तक्षेप होणार आहे

सबब या जाहीर नोटीसीने सर्वत्रास कळविण्यात येते की, वरील नमूद मिळकतीसंबंधाने राणी विलासराव पाटील यांचेशी कोणीही कसलाही गहाण, दान, विक्री हस्तांतर, खरेदी वा तत्सम स्वरुपाचा हस्तांतर अगर कर्जबोजाचा व्यवहार वा दस्त करु नये याउपर कोणी दस्त वा व्यवहार केलेस तो आमचे पक्षकाराचे हिश्यावर बंधनकारक राहणार नाही, लिहून देणार, लिहून घेणार व साक्षीदार यांचेवर आमचे पक्षकार जरुर ती दिवाणी व फौजदारी कारवाई करतील, बोजा मिळकतीवर असतो याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये व आमचे पक्षकाराचे कायदेशीर हक्काची सर्वत्रास जाणीव करुन द्यावी म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता.७/०९/२०२४.

सही/-
श्री. विक्रम व्ही. आगळे, ॲडव्होकेट
श्री. एस. यू. सोनवणे, ॲडव्होकेट
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)
मोबाईल नं. ९८३४५८७८२६

## माळीनगरच्या प्राथमिक शाळेत शिक्षक दिन साजरा

माळीनगर : सासवडमाळी एज्युकेशन सोसायटी माळीनगर प्राथ. शाळा क्र. १मध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी श्रीमंत आतकर, संस्थेच्या खजिनदार ज्योती लांडगे तर प्रमुख पाहुणे म्हणून म्हसे, मुख्याध्यापक बाळकृष्ण कोळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमापूजनाने झाली. शालेय स्पर्धा परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला. मुख्याध्यापक बाळकृष्ण कोळी यांनी संबोधन केले. श्रीमंत आतकर यांनी शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुकही केले. सूत्रसंचालन मनोज देशपांडे यांनी तर आभार विजयसिंह जाधव यांनी मानले

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१
प्रशासकीय इमारत, नगर रचना कार्यालय, दुसरा मजला,

जा.क्र.ससंनर/बां.प/२४/ ६७१ | दि. ०६/०९/२०२४

जाहीर प्रसिध्दीकरण

बांधकाम परवाना विभाग सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

खालील तक्ता मधील ९६ ठिकाणचे बांधकाम परवाना बेकायदेशीर पध्दतीने देण्यात आल्याचे आढळुन आले आहे. सदर प्रकरणी महानगरपालिकेच्या संबंधित अभियंत्यावर सेवा समाप्तीची कार्यवाही करण्यात येऊन यामध्ये महानगरपालिकेकडुन फौजदारी गुन्हा (FIR) देखील नोंदविण्यात आलेला आहे.

करिता सदर बांधकाम धारकांनी आपलेकडील बांधकाम परवाना बाबतचे सर्व कागदपत्रे सोलापूर महानगरपालिकेकडील बांधकाम परवाना कार्यालयाकडे १५ दिवसाचे आत जमा करावेत. अन्यथा सदर तक्त्यातील नुमद जागेवरील बांधकाम परवाना रद्द समजण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच खाली नमुद ९६ बांधकामाच्या जमा करण्यात आलेल्या कागदपत्रांची फेर तपासणी करुन, त्यास UDCPR अंतर्गत नियमानुसार अनुज्ञेय परवानगी देणेत येईल.

| अ. क्र. | बांध-काम परवा-नगी क्रमांक | पेठ | तपशील | अर्जदाराचे नाव | बांधकाम परवानगी मंजुरी दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 121 | RAILWAY LINE | C.S.NO.8125/A 8125/B RAILWAY LINE | ANJUMANE ISLAMHUL MUSTAGIN | 18/05/2022 |
| 2 | 122 | UTTAR KASABA | S.NO.1480 | PRASHANT BHIMASHANKAR DARGOPATIL | 18/05/2022 |
| 3 | 129 | RAILWAY LINE | S.NO.8391/5/7 | SAYYAD SIRAJODDIN MUNIR BASHA SARKAJI | 18/05/2022 |
| 4 | 130 | KASABE SOLAPUR | DHANESHWARI NAGAR S.NO.507/1/2 SAB P.NO.14 | GANESH RAJESH JAMADAR | 18/05/2022 |
| 5 | 131 | PURVA MANGALWAR PETH | HOME NO.125B C.S.NO.3185 | SUNITA SIDDHARAM SAVALGI & ETC THREE | 18/05/2022 |
| 6 | 132 | MAJREWADI | RAMNARAYAN CHANDAK VIHAR S.NO.106/3/342 P.NO.127 | SOU MADHURI ANIL MASHALKAR | 18/05/2022 |
| 7 | 133 | NEHARU NAGAR | C.S.NO.31/A/1/2 REVAN SIDDHEWSHWAR NAGAR | CHARULATA GANESH KULKARNI | 18/05/2022 |
| 8 | 138 | JODBHAVI PETH | HOME 09 S.NO.9036/2 | VIJAY VIJAYKUMAR AJAGUNDE | 19/05/2022 |
| 9 | 139 | SALGAR VADI | BALAJI NAGAR S.NO.17/1B/1 SAB P.NO.65+66+67+68 | SHRIKANT A. CHOPAD | 20/05/2022 |
| 10 | 140 | SALGAR VADI | S.NO.17/1B/1 P.NO.85+86+87+88 | SHRIKANT ASHOK CHOPADA | 20/05/2022 |
| 11 | 147 | PACCHA PETH | HOME NO.1438 & 1439 C.S.NO.10429 F.P.NO.20 SAB P.NO58+59 | RAVINDRA LALAYYA NAKKA & ETC - 2 | 20/05/2022 |
| 12 | 148 | CIVIL LINE | C.S.NO. 153/2A/1 PAIKI , Gandhi Nagar | SATISH SUBHASH KUNULWAR YANCHE | 20/05/2022 |
| 13 | 149 | NEHARU NAGAR | S.NO.5/A/2 & Plot no.5A | ANJU TATYSAHEB PAWAR & TATYASAHEB SONYABAPU PAWAR | 20/05/2022 |
| 14 | 153 | MAJREWADI | NARSINHA NAGAR S.NO.132 SAB P.NO.21 | ANIL SIDRAMAPPA GUDNALE | 20/05/2022 |
| 15 | 162 | KASABE SOLAPUR | RAJMUDRA NAGAR S.NO.437/1/1/4A/1/2 SAB P.NO.61 | JYOTSNA SANTOSH RUPANE | 24/05/2022 |
| 16 | 163 | DEGAON | S.NO.193/1/B/5/C/A/2/4 SAB P.NO.55&56 | NUTAN SOMRAJ GAIKWAD | 24/05/2022 |
| 17 | 165 | KASABE SOLAPUR | S.NO.434/A/1/1 P.NO.40 | NAVAJIT NAGNATH BABAR | 25/05/2022 |
| 18 | 166 | NEHARU NAGAR | MERA BHARAT MAHAN S.NO.28/1/1/2 SAB P.NO.C-17 | SALIM AHAMAD A.SATTAR PATEL | 25/05/2022 |
| 19 | 171 | KASABE SOLAPUR | MANIDHARI 145/2A/145,2B2 PAIKI 146,2B/146,1B1/146 2A/1/146 2A, 2 PAIKI 210 & 211/42 | VIDYADHAR RAMESH YELLARAV | 27/05/2022 |
| 20 | 172 | KASABE SOLAPUR | RANRAJ NAGAR C.S.NO.101/1 SAB P.NO.110/111/36B | SHRINIWAS VIVEK GANJI | 27/05/2022 |
| 21 | 173 | NEHARU NAGAR | 34 VIDYA NAGARI S.NO.356/6/24/6 SAB P.NO.34 | VIJAY SUDAM KHEDARE | 27/05/2022 |
| 22 | 174 | MAJREWADI | SAHARA NAGAR C.S.NO.4/1/A/2/B/2/2 | SOU.MUMTAJ A.RAHIM SIDDIKI &ETC | 27/05/2022 |
| 23 | 175 | PACCHA PETH | S.NO.10389 A/6 F P.NO.35 | NARAYAN AMBAJI KALPAGAR & ETC | 27/05/2022 |
| 24 | 176 | KASABE SOLAPUR | GANDHINAGAR S.NO.153/2/A/1 PAIKI SAB P.NO.08 | SATISH SUBHASH KUNGULWAR YANCHE K.M.SHRI HANMANT KOMYYA BURA | 27/05/2022 |
| 25 | 181 | MAJREWADI | BOLKOTHE NAGAR C.S.NO.33/1/238 SAB P.NO.145 | ASHOK SAYBANNA SAMBOLU | 30/05/2022 |
| 26 | 185 | MURARJI PETH | TP - 4 P.NO.67 PRATIK NAGAR 107+ | SAMBHAJI JIVANDHAR JADHAV | 31/05/2022 |
| 27 | 188 | DAKSHIN SADAR BAJAR | ANAND VINKAR P.NO.39 BLO.NO.10 HOME NO.33 | SHRIGANESH RANGAYYA VALPADAS | 02/06/2022 |
| 28 | 189 | MAJREWADI | MARKANDEY GRUHA N. SANSTHA 220/1A/12+18 SAB P.NO.78 | SOU.SMITA PRABHAKAR SHINDE | 02/06/2022 |
| 29 | 191 | KASABE SOLAPUR | SHARANGURU PARK S.NO.527/1/2/496 SAB P.NO.41 | AMOL DNYANDEV JAVANJAL | 03/06/2022 |
| 30 | 196 | UTTAR SADAR BAZAR | C.S.NO.7107/1/84 P.84 | CHERMAN ADARSH SAHAKARI BILLDING SAH.L.SOLAPUR SABHASAD SOU.SANGITA SHRIKANT PAGE | 06/06/2022 |
| 31 | 202 | UTTAR SADAR BAZAR | S.NO.2508 | M.SHAFI M.YASIN SHAIKH & ETC | 13/06/2022 |
| 32 | 204 | PACCHA PETH | S.NO.10384 F.P.NO 29/A/7/4/2 | BALKRUSHNA DATTATRAY DHANANE & SACHIN VITHAL DHANANE | 13/06/2022 |
| 33 | 206 | PACCHA PETH | S.NO.10377/A/49/2 F.P.NO.49/2 | HAJI A.KARIM DAVALSO KHAIRADI | 16/06/2022 |
| 34 | 208 | RAILWAY LINE | S.NO.8391/14C/4 | DARSHANA CONSTUCTION CHE PRO.PRA. RAJESH CHANDAKIT SHAHA & ETC | 17/06/2022 |
| 35 | 212 | BEGAM PETH | S.NO.5791 TP - 1 | M.YUSUF SAHEB PATEL & ETC | 22/06/2022 |
| 36 | 223 | KASABE SOLAPUR | GANDHI NAGAR A.ROAD S.NO. 153/3A/1/1/155/3A/1/1 SAB P.NO.51/1 | AOUDUMBAR NARAYAN PADMA | 30-Jun-22 |
| 37 | 224 | NEHARU NAGAR | SADGURU GRUHA NIRAMAN S.NO.23/1B/1A SAB P.NO.05 | PRABHAKAR KRUSHNA PALVENCHYA & SUNITA PRABHAKAR PALVENCHYA | 30-Jun-22 |
| 38 | 225 | CIVIL LINE | GURUNANAK NAGAR S.NO.63/1F/15 | GURUNANAK SINDHI KO OF HOUSING SO.SA MOHAN HIROMAL SACHADEV | 30-Jun-22 |
| 39 | 228 | NEHARU NAGAR | MANTRI CHANDAK R.S. S.NO.6/1A/350/1 SAB P.NO.A-53 | SUMAN DNYANESHWAR KAKADE | 04-Jul-22 |
| 40 | 229 | NEHARU NAGAR | INDIRA NAGAR S.NO.33/A/608 | NISHA PRAKASH BHOSALE | 04-Jul-22 |
| | | | PAIKI SAB 86B | | |
| 41 | 233 | SHELAGI | S.NO.114/A(1+2)C 1D,1E | SOU MAHANANDA SATISH SHIRKE | 04-Jul-22 |
| 42 | 234 | NEW PACCHA PETH | C.S.NO.10389A/1 FP.NO.35/1A | SATYANARAYAN MALLESHAM SALAM & ETC | 04-Jul-22 |
| 43 | 244 | TELANGI PACCHA PETH | 10380/135/A P | MAHAMAD JUBER M.SALIM SHAIKH & ETC | 15-Jul-22 |
| 44 | 245 | SIDDHESHWAR PETH | S.NO.6106/2/A/6106/2/B | MUJAHID SHABBIR SAYYAD | 15-Jul-22 |
| 45 | 250 | NEHARU NAGAR | ATTAR NAGAR S.NO.05/1A | SOU.SATKHED KHALIDA AHAMAD URF MOYIN KHALIDA NASIR | 20-Jul-22 |
| 46 | 251 | RAILWAY LINE | S.NO.721 TP III | MUSA RAJAHMAD SHAIKH | 20-Jul-22 |
| 47 | 254 | PACCHA PETH | S.NO.10373/4/49/6+7B | MUMTAJ BEGAM IBRAHIM KILLEDAR | 22-Jul-22 |
| 48 | 262 | NEHARU NAGAR | MASHAL NAGAR S.NO.04/1 P.NO.22P | SHABIR HUSENBASHA SHETSANDI &SIKANDAR HUSENBASHA SETSANDI | 02-Aug-22 |
| 49 | 263 | KASABE SOLAPUR | SHIVNERI PARK S.NO.423/3/1 PAIKI SAB P.NO.3 | ASHOK DNYANESHWAR POUL | 02-Aug-22 |
| 50 | 264 | NEHARU NAGAR | S.NO.25/2B/355/2B SAB P.82 | DATTATRAY DNYANOBA TARANGE | 02-Aug-22 |
| 51 | 266 | GURUWAR PETH | S.NO.4897 | TAHERA M.ILIYAS BAGWAN | 02-Aug-22 |
| 52 | 269 | KASABE SOLAPUR | DHANESHWARI NAGAR –1 S.NO.507/1+2 SAB P.NO.71/15 | SHRI SAI VISHWA BILDARS BHAGIDAR LAXMI NARAYAN DUSSA & ETC -1 | 04-Aug-22 |
| 53 | 283 | RAILWAY LINE | S.NO.8337/2/3 | MAHESH VIJAYPRASAD NIVARI | 22-Aug-22 |
| 54 | 284 | GANESH PETH | S.NO.4989 F.P.NO.53 & 60 | MUSTAK AHAMAD A.VAHAB KAZI | 22-Aug-22 |
| 55 | 285 | SIDDHESHWAR PETH | S.NO.6147 B | SKEAR ONE BILDARS AND DEVLAPARS BHAGIDAR 1)VASIR AHAMAD MEHABUBSAB KHALIFA 2) MOHASIN HARUN SHAIKH | 29-Aug-22 |
| 56 | 286 | PACCHA PETH | S.NO.54/B/16 | SKEAR ONE BILDARS AND DEVLAPARS & ETC | 29-Aug-22 |
| 57 | 291 | MAJREWADI | GOVIND VIHAR S.NO.125/1A SAB P.NO.32 | KAILAS KAMLAKRAO DANKE & ETC ONE | 02-Sep-22 |
| 58 | 298 | TELANGI PACCHA PETH | 10380/91 | ARIF A.GANI MARCHAR | 13-Sep-22 |
| 59 | 301 | UTTAR KASABA | S.NO.2074/B,2074/D/2 | SOU.KALPANA NITIN UPARE & RUPALI VIJAY UPARE & ETC | 15-Sep-22 |
| 60 | 311 | GOLFINCH PETH | C.S.NO.8674 | PREMANATH PRABHAKAR ZAD DEVIDAS KRUSHNAHARI MALYEDDI | 28-Sep-22 |
| 61 | 320 | PACCHA PETH | S.NO.10380/156 TP-1 | TAHAJIF IMTIYAJ DALAL | 12-Oct-22 |
| 62 | 321 | GANESH PETH | S.NO.5052 | SHRI.M.IBRAHIM A RAHIM TADE | 13-Oct-22 |
| 63 | 322 | MAJREWADI | BASAVESHWAR NAGAR S.NO.14/1/B SAB P.NO.A/5 | VAHID MUSTAK BAGWAN KU.MU.ME.GLOBAL IIFCON TARFE CHE BHAGIDAR ASIF ALI A.SATTAR PATHAN | 14-Oct-22 |
| 64 | 340 | NEW PACCHA PETH | HOME NO.370/31A S.NO.10377/4P | SAMIR A.SATTAR KAMISHANAR & ETC | 18-Nov-22 |
| 65 | 342 | MAJREWADI | KONARK NAGAR C.S.NO.136/3/1/2 SAB P.NO.A-45 | ANITA VIJAYKUMAR KATARE | 22-Nov-22 |
| 66 | 343 | DAKSHIN SADAR BAJAR | S.NO.2/3 SAB P.NO.58 F.P.NO.39 | SHRIMATI LATABAI BHIMRAJ KANDEPALLI | 24-Nov-22 |
| 67 | 344 | GAJRAJ NAGAR | C.S.NO. OLD 283/1 A/2B/A S.NO.NAME N. 4/1/12 P.NO.3.4.5.6. | SQUARE ONE BILDARS AND DEVLAPARS & NASIR AHAMAD MAHIBUB SADU KALIFA & ETC | 25-Nov-22 |
| 68 | 356 | LAXMI PETH | C.S.NO.155/53/55 S.NO.TP4 P.NO.B13 &B14 | RAJKUMAR VISHNU LAVATE | 08-Dec-22 |
| 69 | 367 | UTTAR KASBA | S.NO.1877/2 | MALLINATH VISHWAS DARGOPATIL | 21-Dec-22 |
| 70 | 376 | KASABE SOLAPUR | GANDHI NAGAR S.NO.153/2A/1 PAIKI SAB P.NO. 29 | SATISH SUBHASH KUNGULWAR YANCHE KU.MU.SHRI HANMANTU | 04-Jan-23 |
| | | | | KOMAYYA BURA | |
| 71 | 216 | BHAVANI PETH | TP II F.P.NO.49/67 | HANMANT MAHADEV GHOLAP | 28-Jun-22 |
| 72 | 259 | KASABE SOLAPUR | C.S.NO.150/1A/2 152/1/A P.NO.2/10 ANAND VIHAR | SOU.PADMINI BABURAO SHENDAGE & ETC | 29-Jul-22 |
| 73 | 274 | KASABE SOLAPUR | S.NO.434/A/1 P.NO.43 | ANJALI SHIVAJI GHULE | 08-Aug-22 |
| 74 | 275 | BHAVANI PETH | TP II F.P.NO.1028 SAB P.NO.55B | VINAYAK PRAKASH DHANGE & ETC | 08-Aug-22 |
| 75 | 307 | PACCHA PETH | TP I F.P.NO.54B/33+32 | JAHAGIRDAR DEL BHAGIDAR LUKMAN A BASHA JAHAGIRDAR & MU.JAVER A.BASHA JAHAGIRDAR | 22-Sep-22 |
| 76 | 330 | SAKHAR PETH | S.NO.10208/3 | AAKHLAK M.SHARIF BAGWAN & ETC | 31-Oct-22 |
| 77 | 357 | NEHARU NAGAR | S.NO. 28/1/1/2 SAB P.NO.17C | SABIR RAJAK INAMDAR | 09-Dec-22 |
| 78 | 363 | MAJREWADI | S.NO.124/A/4 PAIKI | AMIN MUNAF PATHAN | 15-Dec-22 |
| 79 | 364 | PACCHA PETH | TP 1 F.P.NO.49/13 | SAHIR HAJI A.GANI ADNE | 15-Dec-22 |
| 80 | 365 | SHUKRAWAR PETH | C.S.NO.4179 | FAIJ AHAMAD HAJI AKABAR BHAI BAGWAN | 16-Dec-22 |
| 81 | 366 | BHAVANI PETH | TP 2 F.P.NO.90H SAB P.NO.32 | MALLIKARJUN MARUTIRAO RANGADAL | 20-Dec-22 |
| 82 | 368 | SAKHAR PETH | S.NO.10142 | JAMIR A.SATTAR SHAIKH | 22-Dec-22 |
| 83 | 369 | PACCHA PETH | S.NO.10373/90 TP I F.P.NO.2021 | FARAJAN A.GANI KHARADI | 27-Dec-22 |
| 84 | 370 | SAKHAR PETH | HOME NO.602 S.NO.10298A | ABUBKAR MOHAMMAD SALIM BAGWAN | 27-Dec-22 |
| 85 | 375 | VIJAPUR ROAD | KONARK NAGAR S.NO.3/4 BHAG SAB P.NO.2 TO 5B/3 | RAJENDRA KASHINATH VELMAKAR | 03-Jan-23 |
| 86 | 378 | SALGAR VADI | LOTAS NAGAR S.NO.7/2 A/2/1 P.NO.48 | SAYYAD IMTIYAJ AHAMD RASHID AHMAD MADINI & BILAL MOHAMMAD GOURU SHAIKH | 05-Jan-23 |
| 87 | 389 | SHANIWAR PETH | S.NO. 5392/1 P.NO.140 | M.RIJAWAN M.MUSHTAK ANSARI | 27-Jan-23 |
| 88 | 391 | BHAVANI PETH | F.P.NO.102 C 69 | RAJU VITHAL YEMUL & ETC | 03-Feb-23 |
| 89 | 392 | TELANGI PACCHA PETH | S.NO. TP I FPNO.54/A/15 | ABDULGAFUR ABDUL RAHAMAN DUSAG ABDUL GAFUR ABDUL RAHAMAN DUSAG | 03-Feb-23 |
| 90 | 393 | TELANGI PACCHA PETH | TP 2 FP.NO.54/A/14 | ABDULGAFUR ABDUL RAHAMAN DUSAG ABDUL GAFUR ABDUL RAHAMAN DUSAG | 03-Feb-23 |
| 91 | 394 | NEHARU NAGAR | VIJAY DESHMUKH NAGAR C.S.NO.31/A/1/1 SAB P.NO.106 | MUZAMMIL MANOUDDIN PIRJADE | 07-Feb-23 |
| 92 | 396 | SALGAR VADI | S.NO. 2/1/1/3 PAIKI SAB P.NO.101 | SHAHAJAN MUSA PATEL | 08-Feb-23 |
| 93 | 397 | GANESH PETH | S.NO.4996 | SOU.REHANA BEGAM ASHAPAK DALAL | 08-Feb-23 |
| 94 | 403 | JAVAHAR NAGAR | F.P.NO.11 S.NO.51/1/2 P.NO.3 | IKABAL HUSAIN RAYISAT ALIKHAN | 03-Mar-23 |
| 95 | 2 | BHAVANI PETH | C.S.NO.86/1A/2/8 F.P.NO.09 | VIJAYKUMAR VYANKATESH VITKAR & ETC | 13-Apr-23 |
| 96 | 410 | SHANIWAR PETH | C.S.NO.5366/B P.NO.101 | KHUDABAKSHA HAJI RAHEMBAKSHA BAGWAN | 20/03/2023 |

सही/-
(शीतल तेली-उगले भा.प्र.से.)
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

# सोलापूर डीसीसी बँक

# २५ सप्टेंबरपर्यंत टिकुळे यांना अहवाल सादर करण्याचे निर्देश

✔ सोलापूर/प्रतिनिधी

डिसीसी बँकेचे कलम ८३ चा अहवाल नुसार चौकशी अधिकारी पद संपुष्टात आले असून कलम ८८ नुसार कारवाई करता येत नसल्याने वस्त्रोद्योग विभाग प्रादेशिक उपायुक्त चंद्रकांत टिकुळे यांनी आपला लेखी अहवाल २५ सप्टेंबर पर्यंत लेखी स्वरूपात सादर करावा, असे निर्देश ॲड. तोष्णीवाल यांच्या वतीने दिले आहेत.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक मंडळाने केलेल्या आर्थिक गैरव्यवहार चौकशी प्रकरण सध्या जिल्ह्यात जोर धरत आहे.वादी आणि प्रतिवादी यांच्या वतीने चौकशी आणि तारखा चालू आहेत. पुन्हा ॲड. तोष्णीवाल समितीच्या वतीने पुन्हा चौकशी सत्र चालू आहे. या चौकशीमध्ये कलम ८८ मुख्य मुद्यासह मागील कलम ८३ चा अहवालानुसार पुढील मुद्दे उपस्थित करण्यात आले.



१५ जुलै २०२२ च्या आदेशाद्वारे विभागीय सहनिबंधकांनी कलम ८३ अन्वये केवळ ३ महिन्यांच्या मर्यादित कालावधीसाठी म्हणजे १५ ऑक्टोबर २०२२ रोजी पर्यंतच चौकशी अधिकारी म्हणून टिकुळे यांची नियुक्ती केली. परंतु ३ फेब्रुवारी २०२३ रोजी म्हणजेच ७ महिन्यांनंतर अहवाल सादर केल्याची कबुली टिकुळे यांनी प्रतिज्ञापत्रात दिली आहे. टिकुळे यांच्या नियुक्तीला मुदतवाढ दिल्याचा कोणताही पुरावा रेकॉर्डवर नाही किंवा टिकुळे यांनी प्रतिज्ञापत्रात देखील मुदतवाढ मिळाल्याचे म्हटले नाही. टिकुळे यांनी चौकशी केव्हा व कशी केली, याचाही पुरावा नाही. त्यामुळे ३ महिन्याची महणजेच १५ ऑक्टोबर २०२२ची मुदत संपल्यानंतर टिकुळे यांचा कलम ८३ अन्वये यांचा चौकशी अधिकारी हा दर्जा संपुष्टात आला आहे.

### टिकुळे यांचा अहवाल कायदेशिर नाही

कलम ८३ अन्वये मुदतवाढीचा विभागीय सहनिबंधकांचा कोणताही आदेश नसल्याने टिकुळे यांच्या दि. ३ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या अहवालास कलम ८३ अंतर्गत कायदेशीर दर्जा प्राप्त होत नाही. त्यामुळे, टिकुळे यांचा अहवाल हा कलम ८३ अन्वये नाही. युक्तीवादाची व्याप्ती लक्षात घेऊन लेखी युक्तीवाद दि २५ सप्टेंबरपर्यंत दाखल करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

# डॉ. आंबेडकर आणि माता रमाई यांचे पुतळे केव्हा उभारणार?

## विश्वरत्न डॉ. आंबेडकर उद्यान कृती समितीचा सवाल

✔ सोलापूर : सम्राट चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचे काम अर्धवट स्थितीत थांबले आहे. डॉ. आंबेडकर आणि माता रमाई यांचे पुतळे केव्हा उभारणार असा सवाल उपस्थित करत उद्यानाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून या कामाचे थर्ड पार्टी ऑडिट करावे, अशी मागणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान कृती समितीने आयुक्तांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

कृती समितीच्या वतीने महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांना निवेदन देण्यात आले. उद्यानातील माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणीची वाट सर्व अनुयायी गेल्या ३ वर्षांपासून पाहत आहेत. चबुतऱ्याचे काम वर्षभरापूर्वी अत्यंत निकृष्ट झाले आहे. म्फी थिएटरचे काम देखील अर्धवट स्थितीत बंद आहे. महापालिकेचा कोणताही अधिकारी उद्यानाकडे फिरकत नसल्याने दुरावस्था झाली आहे. पुतळे उभे करण्यासाठी नेमकी अडचण कोणती व त्याबाबत महापालिका प्रशासन गप्प का आहे? असा सवाल कृती समितीने उपस्थित केला आहे.निवेदन देतेवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान कृती समितीचे अध्यक्ष अशोक जानराव, श्याम शिंगे, केरू जाधव, नागसेन माने, अण्णासाहेब वाघमारे रत्नदीप कांबळे, आर.जी.गायकवाड, भारत आवारे, धम्मरक्षिता कांबळ व पदाधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



सोलापूर : पुरस्कारप्राप्त गुणवंत शिक्षकांसह श्रीकांत पाटणकर, जगन्नाथ गायकवाड, ऋषीकेश जाधव व इतर.

### नव्या पिढीसमोर शिक्षक हा सामाजिक आदर्श : डॉ. पाटणकर

✔ सोलापूर : विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास म्हणजेच पाठ्यपुस्तकाद्वारे पाठांतर करून केवळ परीक्षेतील भरघोस मार्क नाही. त्यासाठी सामाजिक भान,वैचारिक विकास व संस्कार महत्त्वाचे आहे. त्यासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. नवीन पिढीसमोर अभ्यासू शिक्षक हा सामाजिक आदर्श करू शकतो असे प्रतिपादन मानसोपचार तज्ञ डॉ. श्रीकांत पाटणकर यांनी केले. कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, येथे आयोजित गुणवंत शिक्षक पुरस्कार कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सहा गुणवंत शिक्षकांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानी क प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे होते. व्यासपीठावर सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समितीचे अध्यक्ष उल्हास पाटील सचिवा सपना चिट्टे, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या डॉ. आयेशा रंगरेज, डॉ. विजया महाजन, डॉ. नभा काकडे होते. यावेळी प्रा. डॉ. नीलिमा - दामले, प्रा.डॉ.दीपक देडे, प्रा. राम ढाले , इस्माईल शेख, संगीता शिर्के, विद्या- हराळे लांबतुर यांचा सन्मान करण्यात आला.

---

### 'त्या; अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी

✔ सोलापूर : महापालिकेतील बोगस बांधकाम परवाना प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी यासह विविध मागण्यांचे निवेदन सोलापूर विकास मंचच्या वतीने पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना देण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, सोलापूर महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागात खोटे आणि बोगस परवाने दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या भ्रष्टाचारामुळे शेकडो कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी केली आहे. ५४ मीटर रस्त्याच्या कामासाठी डीपीडीसी किंवा केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत निधीची तरतूद करावी, विमानसेवा सुरू करण्यासाठी डीजीसीए कडून तातडीने पावले उचलावीत, सण-उत्सवांच्या काळात नागरिकांना स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी मंचने केली आहे. यावेळी सोलापूर विकास मंचचे मिलिंद भोसले, योगिन गुर्जर, केतन शहा, विजय जाधव, ॲड.दत्तात्रय अंबुरे, गणेश शिलेदार, प्रशांत भोसले आदी सदस्य उपस्थित होते.

---

### श्रीशैल अंडगे यांचे निधन



✔ सोलापूर : सराफ बाजार येथील रहिवासी श्रीशैल अंडगे (वय ७०) यांचे शुक्रवार ६ सप्टेंबर रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुले, दोन विवाहित मुली, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

# बार्शी येथील ६५ वर्षांच्या आजीचे पीएम किसान मदत निधीसाठी हेलपाटे

## सहा हफ्ते मिळाले नाहीत; अधिकाऱ्यांची उडवा उडवीची उत्तरे

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सन २०२३ आणि २४ मधील पंतप्रधान किसान मदत निधी अचानक बंद झाला असून थकीत मदत निधी मिळावे म्हणून बार्शीसह, सोलापूर मधील कृषि अधीक्षक कार्यालय येथे अनेक वेळा हेलपाटे मारून देखील थकीत निधी मिळत नसल्याने बार्शी येथील ६५ वर्षीय आजीने अखेर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे धाव घेतली आहे. अधिकारी उडवा उडवीची उत्तरे देत असल्याची त्यांची तक्रार आहे.



रंजना बबन काळे (वय ६५ रा. कोरेगाव, ता. बार्शी) येथिल रहिवासी आहे. त्यांची गट ७०, ८५,९१,२८२ जमीन आहे.पंतप्रधान किसान योजनेंतर्गत या अगोदर त्यांना १८ पैकी ११ हफ्ते २ हजार प्रमाणे २२ हजार रुपये मिळाले आहे. पण गेल्या दीड वर्षांपासून जवळपास ६ हफ्ते जमा झालेच नाही. त्या आजी अल्पभूधारक असून त्यांना एक मुलगा,एक मुलगी आहे. मुलगा आणि सून वेगळे राहत आहेत. मुलीसह शेतात राबून तर कधी दुसऱ्याच्या शेतात काम करून उदरनिर्वाह चालू आहे. पण गेली दीड वर्ष अजूनही पंतप्रधान पीक विमाचा एक रुपया देखील ही जमा नाही. एक वर्षपासून ती आजी बार्शी कृषी विभाग,सोलापूर कृषी अधिक्षक कार्यालय आणि जिल्हा अधिकारी कार्यालय सोलापूर मध्ये हेलपाटे मारीत आहे.

> आजपर्यंत ११ ते १२ हफ्ते माझ्या खात्यात जमा झाले पण अचानकपणे मदत येणे बंद झाले आहे.अनेक ठिकाणी निवेदन देऊन संबंधित अधिकारी आणि कृषी विभाग प्रमुखांना भेट घेतली आहे. कशासाठी बंद झाले हे कळेना झाले आहे.
>
> **-रंजना काळे-बार्शी**
>
> रंजना काळे या आजीबाई आल्या होत्या, त्यांचे पेपर तपासले असता त्यांचा एक मुलगा वारसदार आहे. शासनाच्या वतीने पीक विम्याचा हफ्ता त्यांच्या पोस्ट खात्यात जमा झाला आहे.पण उर्वरीत हफ्त्याबद्दल पावती आणल्यानंतर चेक करू.
>
> **-निंबाळे कृषी अधिकक्षक, सोलापूर**

# विनापरवाना आंदोलन; ७० जणांवर गुन्हा

✔ सोलापूर : काँग्रेस भवन जिल्हा परिषद कार्यालयाजवळील सिद्धेश्वर पेठ येथे कोणतीही परवानगी न घेता विनापरवाना आंदोलन करून पोलिसांनी दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करत आदेशाचा भंग केल्याप्रकरणी ७० जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ४ ते ५ सप्टेंबर रोजी काँग्रेस भवन येथे घडली. याप्रकरणी पो.कॉ. संदीप गुट्टे (नेमणूक जेलरोड पोलीस ठाणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अरविंद घोडके, सतीश बनसोडे, सूरज बचाटे, शरद बिराजदार, बाळू त्रिकोळे, शंकर जाधव, आपण्णा कडमसे, बसवराज कडमसे, बालाजी कुलकर्णी (सर्व.रा.मु. पो.अणदूर) यांच्यासह ७० जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.



सोलापूर : ॲड. राजपूत यांचा सत्कार करताना ॲड. आळंगे व इतर.

# बार असो.तर्फे ॲड. राजपूत यांचा गौरव

✔ सोलापूर : सोलापूर बार असोसिएशनच्यावतीने जिल्हा सरकारी वकिल ॲड. प्रदिपसिंग राजपूत यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. हा सन्मान अध्यक्ष ॲड. अमित आळंगे, उपाध्यक्ष ॲड. व्हि पी शिंदे, सचिव ॲड. मनोज पामुल, खजिनदार ॲड. विनय कटारे यांच्यावतीने करण्यात आला.

यावेळी ॲड. आळंगे, ज्येष्ठविधीज्ञ ॲड. महेश अग्रवाल, ॲड. व्ही एस आळंगे, ॲड. शैलजा क्यातम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना ॲड. राजपूत यांनी आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आव्हानाशी लढलो व प्रामाणिकपणे काम करीत राहिलो म्हणूनच मला अन्यायग्रस्त कुटुंबांना न्याय देता आल्या म्हणाले. कार्यक्रमास ॲड. हिरालाल अंकलगी, सुनिल शेळगीकर, खतीब लक्ष्मण माराडकर, माधुरी देशपांडे, अल्पना कुलकर्णी, बुजरे, शितल डोके, प्रकाश जन्नु, आनंद कुईकर, बागल यांच्यासह असंख्य वकिल बंधु बघिनी उपस्थित होते. सन्मानपत्राचे वाचन खजिनदार ॲड. विनय कटारे, सूत्रसंचालन सचिव ॲड. मनोज पामुल व आभार प्रदर्शन सहसचिवा ॲड. निदा सैफन यांनी केले.

# जिल्ह्यात स्वच्छ माझे अंगण अभियान प्रभावीपणे राबवा

## सीईओ कुलदीप जंगम यांचे आवाहन

✔ सोलापूर/प्रतिनिधी

जिल्ह्यात कुटुंबस्तरावर स्वच्छ माझे अंगण हे अभियान राबवण्यात येणार आहे. १ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार असून यात उत्कृष्ट स्वच्छता असणाऱ्या कुटुंबांचा ग्रामपंचायतीकडून गौरव करण्यात येणार आहे. या अभियानाची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन सोलापूर जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले आहे.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जे कुटुंब वैयक्तिक शौचालय, सांडपाणी व्यवस्थापनकरिता शोषखड्डा, परसबाग, पाझरखड्डा, घनकचरा व्यवस्थापनाकरिता कंपोस्ट खतखड्डा अथवा घरगुती खतखड्डा आणि कुटुंबस्तरावर कचराकुंड्या याबाबतची उपलब्धता करून घेतली असून, त्यांचा नियमितपणे वापर करतात अशा कुटुंबांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचे अनुकरण करण्याकरिता इतर ग्रामस्थांना, कुटुंबधारकांना त्यांच्या प्रमाणेच वैयक्तिक स्वरुपांच्या स्वच्छतेच्या सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करून घेण्यासाठी उद्युक्त करणे ही या अभियानाची संकल्पना आहे.



या बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होवून स्वच्छतेची सवय अंगीकृत करण्यासाठी लोक चळवळ उभी करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यामध्ये 'स्वच्छ माझे अंगण' अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले आहे.

### उत्कृष्ट व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांचा सन्मान होणार

कुटुंबस्तरावरील प्रत्येक घटकाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापन करण्यासाठी गावातील सर्व कुटुंबामध्ये 'स्वच्छ माझे अंगण' अभियान राबविण्याचे निर्देश देण्यात आले असून उत्कृष्ट व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांना २ ऑक्टोबर रोजी ग्रामपंचायत ग्रामसभेमध्ये सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

# टेक्नॉलॉजीबरोबर अपडेट असाल तरच जॉबची मिळणार : कुलकर्णी

## कै. ब्रह्मदेवदादा माने स्मृती व्याख्यानमालेचा समारोप

✔ सोलापूर : आज प्रत्येक क्षेत्रात नवीन टेक्नॉलॉजी येत आहे. तुम्ही टेक्नॉलॉजीबरोबर अपडेट असाल तरच तुम्हाला चांगला जॉब मिळणार आहे, त्यासाठी ती आत्मसात करा आणि यशस्वी व्हा असे प्रतिपादन किर्लोस्कर कंपनीचे एचआर मॅनेजर ऋषिकेश कुलकर्णी यांनी केले.

सहकार तपस्वी कै. ब्रह्मदेवदादा माने यांच्या २२ व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित व्याख्यानमालेचा समारोप



सोलापूर : मुलाखती दरम्यान बोलताना ऋषिकेश कुलकर्णी, भरत वेदपाठक, पारितोष खेर, शिवाजी सुरूवसे.

शहरातील नामांकित कंपन्यातील एचआर हेड यांच्या मुलाखतीने झाला. या मुलाखतीमध्ये किर्लोस्कर कंपनीचे एचआर मॅनेजर ऋषिकेश कुलकर्णी, एलएचपी कंपनीचे हेड भरत वेदपाठक, प्रिसीजनचे एचआर मॅनेजर पारितोष खेर यांनी सहभाग नोंदवला. पत्रकार शिवाजी सुरवसे यांनी त्यांच्या मुलाखती घेतल्या. यावेळी व्यासपिठावर कुमठे शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने शिक्षण प्रसारक मंडळाच्या विश्वस्त स्वाती माने, तानाजी शिनगारे, रसूल शेख आदींची उपस्थिती होती. यावेळी एलएचपी कंपनीचे वेदपाठक म्हणाले की, नोकरीसाठी केवळ डिग्री महत्वाची नाही. त्यासाठी व्यक्तिमत्व विकासही आवश्यक आहे. आपण समाजात कसे बोलतो, कसे वागतो यालाही महत्वा आहे. यावेळी प्रिसीजन कंपनीचे खेर यांनी मुलांना लहान स्वप्न पूर्ण करत मोठे स्वप्न गाठावे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. रोहिणी चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमाला एसपीएममधील विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि कुमठे गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# २८ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात लोक अदालतीचे आयोजन

✔ सोलापूर : सोलापूर जिल्हयात दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात येत असून विधीज्ञ, पक्षकार व नागरिकांनी यामध्ये उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष सलमान आझमी यांनी केले आहे.

राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार सोलापूर शहर व जिल्ह्यामध्ये सदर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन सर्व न्यायालयात करण्यात येत आहे. सदर लोकअदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे बँक वसुली प्रकरणे, कलम ३८ एन. आय. ॲक्टची प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, भुसंपादन बाबतची प्रकरणे तसेच बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखारत, बँक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

# मिळकत कर थकबाकीपोटी दोन शाळांचे कार्यालय केले सील

## महापालिकेची धडक वसुली मोहिमेअंतर्गत कारवाई

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर शहरातील मिळकतकर थकबाकीदारांच्या विरोधात महापालिका मिळकतकर विभागाने कारवाईची मोहीम सुरू केली आहे.

दरम्यान, मिळकत कर थकबाकी पोटी आज शहरातील दोन शाळांचे कार्यालय व मुख्याध्यापक कक्ष सील करण्यात आले आहे.

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशाने व उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मिळकत कर थकबाकीदारांविरोधात कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली आहे.





सोलापूर : मिळकत कर थकबाकीपोटी दोन शाळांचे कार्यालय सील करताना महापालिकेचे कर्मचारी.

६ सप्टेंबर २०२४ रोजी मालमत्ता कर विभागाकडील वसुली मोहिमेअंतर्गत विजापूर रोड, नेहरुनगर येथील मिळकत क्रमांक ३०१०८४ पोस्ट बेसिक आश्रम शाळा याची माहे सप्टेंबर २०२३ अखेर पर्यंतची थकबाकी २ लाख ११ हजार ७०४ व मिळकत क्रमांक ३०१२२८ प्राथमिक गांधी आश्रम शाळा नेहरूनगर यांची रक्कम ४ लाख ६० हजार ८८६ रुपये इतक्या थकबाकीपोटी दोनही प्रशालांचे मुख्याध्यापक कक्ष व कार्यालय सील करण्यात आले आहे.

सोलापूर शहरातील सर्व थकबाकीदार मिळकतदारांनी त्यांच्या मालमत्ता कराची थकबाकीची रक्कम भरुन महानगरपालिकेस सहकार्य करावे अन्यथा अशा मिळकतदारांची स्थावर मालमत्ता सील करण्यात येईल, असा इशारा उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिला आहे.

# भारत प्राथमिक शाळेत शिक्षकदिन उत्साहात साजरा

✔ सोलापूर : जय भारत प्राथमिक शाळेत ५ सप्टेंबर शिक्षकदिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चंद्रकांत साबळे होते. प्रमुख पाहुणे सिद्राम फुले, चेअरमन दिपक फुले, सचिव ना नारायण सुर्यवंशी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी शिक्षक्दिनाचे महत्व सांगित्ले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिक्षा म्हत्रे यांनी केले. सूत्रसंचालन पुजा आरगोळु हिने तर आभार नागेश दीड्डी यांनी केले.

# पल्लोड अन् दायमा यांना दाधीच समाजभूषण पुरस्कार जाहीर

## बुधवारी होणार वितरण

✔ सोलापूर/प्रतिनिधी

श्री दाधीच (दायमा) समाज संस्थेतर्फे देण्यात येणारे राज्यस्तरीय दाधीच भूषण पुरस्कार यंदाच्यावर्षी सोहनलाल पल्लोड आणि ओमप्रकाश दायमा यांना जाहीर झाले आहेत. त्यागमूर्ती महर्षी दधीची जयंतीनिमित्त बुधवार ११ सप्टेंबर रोजी चाटी गल्ली येथील गायत्री भवनात सायंकाळी पाच वाजता हा पुरस्कार वितरण कार्यक्रम होणार आहे.



सोहनलाल पल्लोड



ओमप्रकाश दायमा

उत्कृष्ट सामाजिक कार्य आणि योगदानासाठी श्री दाधीच (दायमा) समाज संस्थेतर्फे या पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. त्यागमूर्ती महर्षी दधीची जयंतीनिमित्त बुधवारी सकाळी नऊ ते दुपारी चार वाजेपर्यंत चाटी गल्ली येथील गायत्री भवनमध्ये दधीच युवा संघटनेतर्फे रक्तदान शिबिर होणार आहे. सायंकाळी पाच वाजता त्याच ठिकाणी पूजा, पुरस्कार वितरण तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यानंतर रात्री आठ वाजता समाज बांधवांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल. यावेळी समाज बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री दाधीच (दायमा) समाज संस्थेचे अध्यक्ष भरत काकडा आणि सचिव विजयकुमार इटोदिया (दायमा) यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त



परंडा : मातीच्या मुर्तीसह पंडित कुलकर्णी, राजेंद्र कडबने, महेश कसबे आदींसह विद्यार्थी.

### परंडा तालुक्यात मातीच्या गणेशमूर्ती निर्मितीची कार्यशाळा

**परंडा** : गणेशोत्सवानिमित्त नगरपरिषद परंडा व माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणपूरक शाडू मातीच्या गणेश मूर्ती बनविण्याबाबतची कार्यशाळा गुरुवारी (दि.५) पार पडली. गोपीनाथ मुंढे सभागृह, परंडा येथे स. १० ते दु. ३ यावेळेत नगरपरिषद परंडाच्या मुख्याधिकारी मनिषा वडेपल्ली यांच्या उपस्थितीत व धाराशिवचे प्रशिक्षक कलाकार राजकुमार कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा झाली. नगरपरिषदेचे पंडित कुलकर्णी, राजेंद्र कडबने, महेश कसबे, संतोष दीक्षित व महेश एकशिंगे उपस्थित होते. कार्यशाळेस जि. प. शाळा मुलांची व मुलींची विद्यार्थी व महात्मा गांधी विद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षकांनी प्रतिसाद दिला. यावेळी मुलांनी शाडू मातीपासून सुबक गणेश मूर्ती बनविल्या होत्या.

---



उत्तर सोलापूर : खा. अनिल देसाईंच्या हस्ते श्री गणेश आरती संग्रहाचे प्रकाशनप्रसंगी प्रशांत मांडळकर व अन्य.

### खा. अनिल देसाईंच्या हस्ते गणेश आरती संग्रहाचे प्रकाशन

**उत्तर सोलापूर** : शिवसेनाभवन येथे खा. अनिल देसाई यांच्या हस्ते श्रीगणेश आरती संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी मोहोळ विधानसभा संपर्कप्रमुख प्रशांत मांडळकर, सोलापूर उत्तर शहर संपर्कप्रमुख काशिनाथ बासुतकर, सोलापूर मध्य संपर्क प्रमुख शशिकांत आगवणे, सोलापूर दक्षिण शहर संपर्क प्रमुख अरविंद आडवीळकर, दिवाकर भटकळ, ॲड. औरिलीयस डिसिल्वा, सेजल सदाफुले आदी उपस्थित होते.

---

### प्रज्ञा महा-ई-सेवा केंद्रात बांधकाम कामगारांची नोंदणी : सातपुते

**पिलीव** : पिलीव (ता. माळशिरस) येथील प्रज्ञा महाईसेवा केंद्रात सध्या बांधकाम कामगारांची नोंदणी सुरु असल्याचे



केंद्राचे सर्वेसर्वा रणजित सातपुते यांनी सांगितले. बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठी कुटुंबातील सर्वांची आधारकार्ड, रेशनकार्ड झेरॉक्स, इंजिनिअर किंवा ठेकेदाराचा कामावर असल्याचा दाखला, दोन पासपोर्ट साईज फोटो या कागदपत्रांची आवश्यकता आहे. या नोंदणीकामी गायकवाड व इतर मान्यवरांचे सहकार्य लाभत आहे. यापूर्वी महा-ई-सेवाकेंद्राच्या माध्यमातून हजारो बांधकाम कामगार व त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळवून दिली आहे. तरी बांधकाम कामगारांनी नोंदणी करावी, असे आवाहन रणजित सातपुते यांनी केले आहे.

---

### श्री सिध्दांत शिखामणी पारायणाची मोहोळ येथे सांगता

**सोलापूर** : मोहोळ येथील श्री. सिध्देश्वर मंदिरात श्रावणास पारायणाची सांगता करण्यात आली. गेल्या ११ वर्षांपासून हा उपक्रम सुरु आहे. यावर्षी श्री सिध्दांत शिखामणी व ज्ञानेश्वरीचे पारायण झाले. पारायणात सिध्देश्वर मोटे, विक्रम मोटे, सिध्देश्वर खोबरे, सुरेश कुदळे, रामचंद्र गायके, अण्णासाहेब पाटील, सिध्देश्वर गायके, डॉ. वसंतराव लवंगे यांनी सहभाग घेतला होता. श्रावण मासात काशी येथून ऑनलाईन पध्दतीने श्री.श्री. श्री. येथे १००८ जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी यांनी श्री सिध्दांत शिखामणीवर आशिर्वचन केले. यावेळी सर्व पारायणाला बसणाऱ्या व्यक्तींना डॉ. वसंतराव लवंगे यांच्यातर्फे शाल व भोरे परिवाराच्यावतीने स्टील ताट श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. उमेश मॅडगुळे, वसंत पडंग, अण्णु महाराज, दिलीप मोटे (ठाकरे), अंबादास स्वामी, मेटकरी, बजरंग गुरव, दयानंद भोरे, वसंत राजू पाटील, हणमंत गोटे उपस्थित होते.



दक्षिण सोलापूर : तीर्थ येथील शाळेत बोअर घेताना सिद्धेश्वर बिराजदार व अन्य.

### जि. प. प्राथमिक कन्नड शाळा तीर्थ येथे स्वखर्चातून घेतले बोअर

**दक्षिण सोलापूर** : तीर्थ (ता. द. सोलापूर) येथील जि. प. प्राथमिक कन्नड शाळेत पिण्याच्या पाण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिद्धेश्वर बिराजदार यांच्या कुटुंबीयांकडून मोफत बोअर घेण्यात आली. यावेळी वेदमूर्ती सिद्धारूढ स्वामी, वाले, हिरेमठ, गंगाबाई कुर्ले, सुनील पाटील, दयानंद कोरे, हसन मुल्ला, माजी सरपंच ईलाई मुल्ला, मुख्या. उत्तमकुमार जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सिद्धेश्वर बिराजदार,ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. बोअरला शंभर फुटालाच भरपूर पाणी लागल्यावर वेदमूर्ती सिद्धारूढ स्वामी यांच्या हस्ते गंगापूजन करण्यात आले. सिद्धेश्वर बिराजदार यांनी स्वखर्चाने बोअर मारुन दिल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वारीतील महाआरोग्य शिबिराचा जागतिक विक्रम

## ‘इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड’ मध्ये झाली नोंद
## लाखो वारकऱ्यांसाठी आरोग्यमंत्री तानाजी सावंत ठरले ‘आरोग्य दूत’

**पंढरपूर/प्रतिनिधी**

**'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत आषाढी वारी कालावधीत पालखी मार्ग आणि पंढरपुरातील चार ठिकाणच्या महाआरोग्य शिबिरांमध्ये १५ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरवत राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने विक्रमी कामगिरी केली आहे. जगातील या सर्वात मोठ्या महाआरोग्य शिबिराची नोंद 'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डस'ने घेतली असून, हा विक्रम महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे.**

राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली देहू-आळंदी ते पंढरपूर व इतर जिल्ह्यातील पालखी मार्गावर शस्त्रक्रिया व सुपरस्पेशालिटी सेवेची व्यवस्था महाआरोग्य शिबिरांद्वारे नेत्रविकार, हृदयरोग, किडनी, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, त्वचारोग आदींवर मोफत उपचार करण्यात आले.

ज्या वारकऱ्यांना शस्त्रक्रिया व सुपरस्पेशालिटी सेवेची आवश्यकता भासेल, त्यांची स्वतंत्रपणे नोंदणी करून, सर्वांवर त्या-त्या भागात मोफत शस्त्रक्रियांची व्यवस्था केली. स्वतः आरोग्यमंत्री प्रा. डॉ. सावंत यांनी




तशा सूचना दिल्या.

सर्वत्र लाखो वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणीसह सर्व प्रकारच्या औषधोपचारांची सेवा उपलब्ध केली होती. तसेच पंढरपूर येथे दि. १४ ते १८ जुलै या कालावधीत वाखरी, गोपाळपूर, तीन रस्ता, ६५ एकर पंढरपूर येथे तीन दिवस २४ तास महाआरोग्य शिबिरांचे आयोजन करून वारकऱ्यांना विविध आरोग्यविषयक सेवा पुरविण्यात आल्या.

आरोग्यमंत्री प्रा. डॉ. सावंत यांच्यासह प्रा. शिवाजी सावंत, आरोग्य विभागाचे डॉ. धर्मेंद्र कुमार, डॉ. दिलीप पवार यांच्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल गौरव करण्यात आला आहे.

### पंधरा लाख वारकऱ्यांनी घेतला लाभ

तब्बल १५ लाख १२ हजार ७७४ वारकरी, नागरिकांनी आरोग्य सेवेचा लाभ घेतला. राज्यभरातील ७ हजार ५०० डॉक्टर आणि पॅरामेडिक कर्मचाऱ्यांनी यात सहभाग घेतला होता. पालख्या आणि दिंड्यांमध्ये सहभागी झालेल्या लाखो वारकऱ्यांना रस्त्यात काही त्रास जाणवला की लगेच उपचार मिळावेत, यासाठी आरोग्य विभागाने सलग दुसऱ्या वर्षी हा उपक्रम राबविला होता.



CERTIFICATE

INTERNATIONAL WORLD RECORDS OF EXCELLENCE BOOK OF RECORDS

RECORD HOLDER
DR. TANAJIRAO SAWANT
(HEALTH & FAMILY WELFARE MINISTER, GOVT. OF MAHARASHTRA)

THE WORLD RECORD OF
"LARGEST MEDICAL CAMP ORGANISED"
WAS ACHIEVED BY DR. TANAJIRAO SAWANT, MR. SHIVAJIRAO SAWANT, DR. DHARMENDRA KUMAR, DR. DILIP PAWAR & R. K. HIV AIDS RESEARCH & CARE CENTRE
ON 18TH JULY 2024 FROM MUMBAI (MAHARASHTRA) INDIA.
THEY ORGANIZED THE LARGEST MEDICAL CAMP IN PANDHARPUR, MAHARASHTRA, IN WHICH 15,12,774 PEOPLE PARTICIPATED, GOT THEIR MEDICAL CHECK-UPS DONE BY 7500 DOCTORS AND PARAMEDICS

SALUTE THE TALENT

WWW.INTERNATIONALBOOKOFRECORDS.COM

---

# पोलीस पाटील संघटनेकडून जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना गाव कामगार पोलीस पाटील संघटनेकडून जिल्हाध्यक्ष शिवानंद फुलारी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पाटलांनी विविध मागण्यांचे निवेदन दिले.

प्रलंबित चार महिन्याचे मानधन तात्काळ मिळावे, दर महिना वेळच्या वेळी मानधन मिळावे, प्रवास भत्ता, टी. ए. बिल देण्यात यावे तसेच पोलीस पाटलांना नवनवीन सूचना, काम करण्यासाठी माहिती व कायद्याचे ज्ञान वृद्धिंगत व्हावे, यासाठी किमान एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात यावी, आदी मागण्या निवेदनात केले होते. अधीक्षक कुलकर्णी यांनी याकामी तात्काळ लक्ष घालून पोलीस पाटलांचे प्रश्न लवकर मार्गी लागतील व पोलीस पाटलांसाठी खास एक नवीन उपक्रम राबविण्यात येतील, असे सांगितले.

निवेदन देताना गाव कामगार पोलीस पाटील संघाचे जिल्हाध्यक्ष शिवानंद फुलारी, कार्याध्यक्ष सैफन बेगडे, दक्षिण सोलापूर तालुक्याचे अध्यक्ष विजय गावडे, सचिव धर्मराव कोळी व अक्कलकोट तालुक्यातील पोलीस पाटील महादेव बिराजदार, उमेश देडे, श्रीशैल पाटील, मळसिध्द कांबळे, प्रकाश बिराजदार, बंडगर, पोतदार, चिदानंद हिरेमठ यासह मंगळवेढा, माढा, बार्शी, दक्षिण सोलापूर तालुक्यातील अनेक पोलीस पाटील उपस्थित होते.

जिल्ह्यात ८९१ पोलीस पाटील आहेत. गणेशोत्सव, दसरा, दिवाळीसारखे मोठे सण तोंडावर असताना तब्बल चार महिन्याचे मानधन प्रलंबित आहेत. प्रवास भत्त्याचा पत्ता नाही. यामुळे जीवन जगणे कठीण झाले आहे, असे राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे जिल्हाध्यक्ष शिवानंद फुलारी पाटील यांनी सांगितले.

## मोहोळ मागासवर्गीय शिक्षक संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी सत्यवान खंदारे बिनविरोध

**मोहोळ** : मोहोळ मागासवर्गीय शिक्षक संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी सत्यवान खंदारे तर सरचिटणीसपदी बाबा शेरखाने यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सोलापूर जिल्हा मागासवर्गीय शिक्षक संघटनेची कार्यकारिणी सभा सोलापूर येथे झाली. यावेळी नूतन जिल्हा कार्यकारिणी व जिल्ह्यातील सर्व तालुका कार्यकारिणी यांच्या निवडी करण्यात आल्या. यावेळी या निवडी करण्यात आल्या.

सत्यवान खंदारे हे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा चंद्रमौळी गणेश मंदिर मोहोळ, या शाळेतील उपक्रमशील शिक्षक आहेत. तर बाबा शेरखाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळेगाव येथे कार्यरत आहेत. यावेळी कोषाध्यक्षपदी महादेव गवळी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीबद्दल मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष शामराव जवंजाळ, जो.शा.बा. पतसंस्थेचे चेअरमन बाळासाहेब कारंडे, हणमंत यादव व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.



सोलापूर : मंद्रुप येथे बसवेश्वर प्रतिष्ठानकडून फ्रिजवाटप प्रसंगी सुजित नरहरे, मनोज पवार, आप्पाराव कोरे, अनिता कोरे आदी.

# बसवेश्वर प्रतिष्ठानकडून अंगणवाड्यांना फ्रीज वाटप

**सोलापूर/प्रतिनिधी**

बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते श्रीशैल हत्तुरे यांच्याकडून दक्षिण सोलापूर तालुक्यातील सर्व अंगणवाडींना फ्रिज वाटप करण्यात येत आहे. त्याचा प्रारंभ मंद्रूप येथील अंगणवाड्यांना पाच फ्रिज वाटप करुन करण्यात आला.

कार्यक्रमास मंद्रूपचे अपर तहसीलदार सुजित नरहरे, मंद्रूपचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार, माजी कृषी सभापती आप्पाराव कोरे, सरपंच अनिता कोरे, उपसरपंच भगवान व्हनमाने, एकात्मिक बालविकास अधिकारी विशाल भोसले, ऋषिकेश जाधव, डॉ. शिवानंद झळके, ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब शिळळे, शिवपुत्र जोडमोटे, बसवराज पनशेट्टी शिवानंद लोभे, बाबूलाल लिगेवान आदी उपस्थित होते.

पंधरा वर्षात आपण तालुक्यात बसवेश्वर प्रतिष्ठानच्या माध्यमातून जळीतग्रस्तांना घर बांधून त्यांना संसारोपयोगी साहित्य दिले. आरोग्य व रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला. भजन कीर्तन व्याख्यानच्या माध्यमातून समाज जागृती करीत आहे.

तालुक्यातील सर्व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना सकस आहार मिळावा, भाजीपाला खराब होऊ नये यासाठी आपण मतदारसंघातील प्रत्येक अंगणवाडीला फ्रिज देण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार तालुक्यात आपण शंभर फ्रिज वाटणार आहोत. मंद्रूप येथे या उपक्रमाचा प्रारंभ केला आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी आपण हा उपक्रम राबवित आहोत. येणाऱ्या काळातही आपण सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी कटिबद्ध असल्याचे श्रीशैल हत्तुरे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी वाडकर यांनी केले. आभार विशाल केवटे यांनी मानले.

---

# मराठा सेवा संघाचे मराठा भूषण पुरस्कार जाहीर

## डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील, डॉ. राणे, ॲड. पाटील, पै. मगर, प्रा. सावंत, पवार व पराडे होणार सन्मानित

**अकलूज/प्रतिनिधी**

आपल्या कार्यकर्तृत्वाने समाजासाठी योगदान देणाऱ्या मराठा समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या गुणीजनांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असल्याची माहिती मराठा सेवा संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य उत्तम माने यांनी दिली.

रविवार दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी १०.०० वा. अकलूज येथील अन्नपूर्णा मंगल कार्यालय या ठिकाणी होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील असणार असून पुरस्कार वितरण सोहळा माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते तर, प्रमुख उपस्थिती म्हणून अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शीतलदेवी मोहिते पाटील, अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

पुरस्कारात ज्यांचे नोबल पुरस्कारासाठी नामांकन झाले होते, त्या डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांना सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार, वैद्यकीय क्षेत्रामध्ये गेल्या ४४ वर्षापासून अविरत सेवा देणारे अकलूजचे प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. राजीव राणे-कविटकर, विधीक्षेत्रात बोरगाव येथील ॲड. प्रकाश पाटील, क्रीडा क्षेत्रात आपल्या कुस्तीने सर्वदूर परिचित असलेले निमगाव येथील मल्लसम्राट रावसाहेब मगर, शिक्षण क्षेत्रात नातेपुते येथील प्रा. उत्तम सावंत, प्रसारमाध्यम क्षेत्रात काम करणारे नातेपुते येथील पत्रकार संजय पवार, तर कृषी क्षेत्रात योगदान देणारे बाभुळगाव येथील अजित पराडे यांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे, असे मराठा सेवा संघ तालुका शाखा माळशिरस यांनी सांगितले.

यावेळी मराठा सेवा संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष रवींद्र पवार, अध्यक्ष निनाद पाटील, कार्याध्यक्ष डॉ. अमोल माने, सचिव राजेंद्र मिसाळ, बाळासाहेब पराडे, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष दिगंबर मिसाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# संप मिटला तरी एस.टी.च्या कर्मचाऱ्यांच्या व्यथा कायम

**सांगोला/प्रतिनिधी**

एस. टी. कर्मचारी मागण्यांसाठी संपावर गेले होते. संप मिटला असला तरी त्यांच्या मागण्या आजही तितक्याच संवेदनशील, गंभीर आहेत. कर्मचाऱ्यांच्या बोलण्यातून या वेदना जाणवतात.

प्रचंड वाढलेल्या महागाईच्या या काळात अत्यंत तुटपुंज्या वेतनावर एसटी कर्मचारी अहोरात्र मेहनत करून सर्वसामान्य प्रवाशांचा प्रवास सुखकारक करीत आहेत. परंतु याच कर्मचाऱ्यांच्या जीवनाचा प्रवास मात्र खडतर बनला आहे. एसटी कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सातवा वेतन आयोग मिळावा ही या कर्मचाऱ्यांची रास्त मागणी आहे. मात्र त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून या कर्मचाऱ्यांच्या मागण्याला बेदखल करण्यात येत आहे. सातत्याने एसटी महामंडळ तोट्यात आहे असे



महामंडळाकडून भासवून शासनास खोटी माहिती पुरवली जात आहे. सातवा वेतन आयोग या कर्मचाऱ्यांना दिल्यास महामंडळाचे फार मोठे नुकसान होणार नाही. अनेक योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन महामंडळाकडे मोठ्या प्रमाणात निधी अलीकडील काळामध्ये वितरित करीत आहे. महिला सन्मान, अमृत, अपंग, विद्यार्थिनी मोफत पास योजना अशा अनेक योजनांच्या माध्यमातून शासन दरवर्षी सुमारे ४००० कोटी इतका निधी महामंडळाकडे देत आहे. त्यामुळे अलीकडील काळामध्ये एसटी महामंडळ हे तोट्यात नसून नफ्यात आलेले आहे. अशा प्रसंगी ज्या कर्मचाऱ्यांच्या घामावर व कष्टावर या महाराष्ट्राच्या जीवनवाहिनीची चाक फिरते आहे. त्या कर्मचाऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळाला पाहिजे. सातव्या वेतन आयोगाची मागणी मंजूर व्हावी, अशी भावना संप मिटला तरी कर्मचाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली.

एसटी महामंडळाच्या कष्टकऱ्यांच्या पाठीमागे मी ठामपणे उभा राहणार आहे. चक्काजाम करण्याची वेळ आली तरी मी मागे हटणार नाही, असे यावेळी आ. दीपक साळुंखे पाटील यांनी सांगितले.

### महामंडळ नफ्यात असल्याचा कर्मचाऱ्यांचा दावा

अनेक योजनांच्या माध्यमातून शासन दरवर्षी सुमारे ४००० कोटी इतका निधी महामंडळाकडे देत आहे. त्यामुळे अलीकडील काळात एसटी महामंडळ हे तोट्यात नसून नफ्यात आलेले आहे.



दक्षिण सोलापूर : मद्रे गावच्या यात्रेत देवाची पालखी वाहून नेताना संतोष पवार यांच्यासह अन्य पदाधिकारी.

# आनंदनगर मद्रे यात्रा म्हणजे संस्कृतीचा संदेश : पवार

## श्री गुरु सोमेश्वर, बनसिद्धेश्वर महाराजांची यात्रा उत्साहात

**दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी**

मद्रे गावातील यात्रा फक्त एक धार्मिक कार्यक्रम नसून, ती आपल्या संस्कृती, परंपरा आणि एकतेचे जिवंत उदाहरण आहे, असे मत मद्रे गावचे सुपुत्र आणि मार्ग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष पवार यांनी व्यक्त केले.

श्री गुरु सोमेश्वर व बनसिद्धेश्वर महाराजांच्या २ दिवसीय वार्षिक यात्रेचा उत्सव संतोष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यात्रेत त्यांनी विशेष उपस्थिती लावून यात्रेची शोभा द्विगुणीत केली. त्यांनी श्री गुरु सोमेश्वर व बनसिद्धेश्वर महाराजांचे दर्शन घेतले. खांद्यावर पालखी वाहत प्रदक्षिणा घातली. भंडाऱ्याची मुक्त उधळण करत त्यांनी यात्रेतील भक्तिमय वातावरणात गावकऱ्यांसह सक्रिय सहभाग घेतला. यात्रेतील महाप्रसाद वितरणाच्या कार्यक्रमातही त्यांनी सहभाग नोंदवून भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.

संतोष पवार यांनी सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी, ग्रामस्थांच्या, शेतकऱ्यांच्या अन् गोरगरीबांच्या सुख-समृद्धीसाठी आणि शांततेसाठी साकडं घातलं. यात्रेला उपस्थित भाविकाला त्यांनी शुभेच्छा दिल्या. यात्रेच्या कालावधीत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम झाले. नियोजनासाठी यात्रा समिती आणि गावकऱ्यांनी केलेल्या परिश्रमाचे पवार यांनी विशेष कौतुक केले.

याप्रसंगी मेघराज पवार (नाईक), बालू राठोड (कारभारी), ताराशिंग राठोड, सीताराम राठोड, प्रकाश पवार, पांडू पवार, संतोष राठोड, लक्ष्मण राठोड, बाबू पवार, बाळू राठोड, फुलशिंग राठोड, मेघराज राठोड, गोपू पवार, किसन पवार, सामू राठोड, हेमू राठोड व यात्रा पंच कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

# आज बाप्पा विराजमान होणार; भाविकांचा उत्साह शिगेला

**सोलापूर/प्रतिनिधी**

विघ्नहर्त्या गणरायाच्या आगमनाची प्रतीक्षा संपली असून शनिवारी शहरातील सार्वजनिक मंडळे आणि घरोघर श्रींची प्रतिष्ठापना होणार आहे. गणेशाच्या प्रतिष्ठापनेसाठी जय्यत तयारी सुरू झाली असून सार्वजनिक मंडळांनी शहर सजवले आहे.

संपूर्ण शहरात उत्साह पाहायला मिळत आहे. शनिवारी गणरायाची प्रतिष्ठापना केल्यानंतर पुढील दहा दिवस प्रत्येकजण लाडक्या बाप्पाच्या भक्तिरसात रंगून जाणार आहे. बाजारपेठांमध्येही गणेशोत्सवाचा उत्साह दिसून येत आहे. गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी शुक्रवारी बाजारपेठांमध्ये लोकांची मोठी झुंबड उडाल्याचे चित्र होते.

बाप्पाच्या प्रतिष्ठापनेची अवघे सोलापूरकर वाट पहात आहेत. टाळ-मृदंगांचा गजर, ढोल ताशा पथकांचा निनाद आणि गुलालाची उधळण करीत बाप्पाच्या आमगन सोलापूर नगरीत आज वाजत-गाजत दुमदुमणार आहे.

शनिवारी शहरातील चारही दिशांना विसर्जन मिरवणुका निघणार आहेत. बाळीवेस, टिळक चौक, मधला मारुती हा मार्ग सकाळी सहा वाजल्यापासून वाहतुकीसाठी बंद असणार आहे. सार्वजनिक गणेश उत्सव मध्यवर्ती, विजापूर मध्यवर्ती, लष्कर मध्यवर्ती, लोकमान्य संयुक्त मध्यवर्ती, पूर्व विभाग मध्यवर्ती, जुना विडी घरकुल मध्यवर्ती, जुळे सोलापूर मध्यवर्ती यांच्या पंरपरेनुसार मिरवणुका निघणार आहेत.

या अनुषंगाने शहर आयुक्तालयाच्या वतीने बंदोबस्त लावलेला आहे. पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ८६९ पोलीस कर्मचाऱ्यांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी



सोलापूर : गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी शहरातील नवीपेठ भागात विविध वस्तू खरेदीसाठी भाविकांची झुंबड उडाल्याचे दिसून आले.

## पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त



सोलापूर: अनेक भाविकांनी आदल्या दिवशी म्हणजेच शुक्रवारीच गणरायाची मूर्ती घरी नेली.

### फौजदार चावडी हद्दीत २८ मंडळांच्या मिरवणुका

सोलापूर शहरात फौजदार चावडी हद्दीतील मिळवणुका पत्रा तालीम मंडळ, सोन्या मारुती मंडळ, मनाचा अय्या गणपती, जगदंबा प्रतिष्ठान, श्री राजे मंडळ, ओंकार मित्र मंडळ, जनता बँक कर्मचारी मंडळ, सरदार वल्लभभाई मंडळ अशा २८ मंडळांच्या मिरवणूक असणार आहे.

### असा असणार बंदोबस्त

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात प्रतिष्ठापना म्हणजेच शनिवारी मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये तीन पोलीस उपायुक्त, पाच सहायक पोलीस आयुक्त, १८ पोलीस निरीक्षक,६४ सहायक पोलीस निरीक्षक, ८६९ पोलिस अंमलदार, ५०० पुरुष आणि महिला होमगार्ड तसेच एक एस आर पी एफ ची तुकडी बंदोबस्तासाठी तैनात असणार आहेत.

### ६९ ठिकाणी फिक्स पॉईंट

विसर्जन होईपर्यंत शहर परिसरात ६९ ठिकाणी मुख्य फिक्स पॉईंट लावण्यात आलेले आहेत. याशिवाय पोलिस आयुक्तालयांच्या हद्दीतील सात पोलिस ठाण्यांतर्गत सशस्त्र पोलिस दल तैनात करण्यात आले आहे. शिवाय गल्ली बोळात विविध मार्गावर पायी पेट्रोलिंगही असणार आहे. शहर पोलिस आयुक्तालयांतर्गत सात पोलिस ठाण्यांच्या दुचाकीवरुन अंमलदार बीट मार्शल पेट्रोलिंग करतील. यामध्ये दिवसा प्रत्येक पोलिस ठाण्याचे पेट्रोलिंग असेल.

### भाविकांसाठी मदत केंद्रे

शहराच्या मध्यवर्ती भागात भाविकांसाठी पोलिस मदत केंद्रे सुरु करण्यात येणार आहेत. तसेच, काही प्रमुख चौकांमध्ये मनोऱ्यावरून गर्दीतील गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यात येणार आहे.



सोलापूर : गणपतीसमोर लागणाऱ्या आरासाचे साहित्य पाहताना भाविक.

---



सोलापूर : अरुण राठोड याचा सत्कार करताना महेश माने, प्राचार्य डॉ. मधुकर पवार व इतर.

## सिल्वर मेडल प्राप्त राठोड याचा सत्कार

**सोलापूर** : बेंगलोर येथील झालेल्या ओपन राष्ट्रीय ॲथलेटिक स्पर्धेत अरुण राठोडने दहा किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेत सिल्वर मेडल प्राप्त केले. त्याच्या कर्तुत्वास सन्मान करण्यासाठी छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजतर्फे त्याचा सत्कार करण्यात आला. त्याचा शिवाजी नाईट कॉलेज या शिक्षण संकुलाचे अध्यक्ष मनोहर सपाटे, सचिव प्रा.महेश माने, प्राचार्य डॉ. मधुकर पवार सोलापूर विद्यापीठाचे आधी सेवा सदस्य प्रा. सचिन गायकवाड आणि प्रा. संतोष गवळी यांनी अभिनंदन केले.

## विवाहितेचा छळ; पतीसह चार जणांविरुद्ध गुन्हा





**सोलापूर** : तुझा नवरा काही काम धंदा करीत नाही,पैसे कमवत नाही असे म्हणून घालून पाडून बोलून विवाहितेला व्यवसायासाठी माहेरून पैसे घेऊन ये म्हणत मारहाण करून छळ करण्यात आला.

याप्रकरणी पतीसह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी नेहा समीर फुलारी (वय-२२, रा.मोमीन नगर, मुळेगाव रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

त्यांच्या फिर्यादीवरून पती समीर रजाक फुलारी, सासू अलमास रजाक फुलारी, सासरा रजाक फुलारी, जाऊ यास्मिन फुलारी सर्व (रा.६९, संगमेश्वर नगर, सुत मिलजवळ अक्कलकोट रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

### अक्कलकोट रोडवरील दुचाकीच्या धडकेत तरुण जखमी

अक्कलकोट रोड वरील नितीन नगर जवळ दुचाकीच्या धडकेत तरुण जखमी झाल्याची घटना ३ सप्टेंबर रोजी रात्री घडली. याप्रकरणी चंद्रकांत सुभाष बटगिरी (वय-२४, रा.अक्कलकोट रोड, नितीन नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून प्रमोद निंबाळ (रा.कामगार वसाहत सुनील नगर) शेजारी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार नवले हे करीत आहेत.

### शेतात काम करताना महिलेस सर्पदंश

शेतात काम करताना डाव्या पायास सर्पदंश झाल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी दुपारी बारा वाजता घडली. यात शालन मारुती लोकरे (वय-५५, रा.अनगर तालुका मोहोळ) यांना सर्पदंश झाला. उपचार मोहोळ येथे करून पुढील उपचारासाठी सिव्हिलमध्ये सून मोहिनी लोकरे यांनी दाखल केले.

### गरम पाणी अंगावर पडून एकजण जखमी

**सोलापूर** : आंघोळीसाठी गॅस शेगडीवर पाणी गरम उतरवताना हातातून निसटल्याने पायावर पडून एकजण जखमी झाला. ही घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात कुमार नाथा कांबळे (वय-४५, रा. राजस्व नगर, विजापूर रोड) हे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हिलमध्ये येथे भाची अनुराधा साखरे यांनी दाखल केले.

## दुचाकीच्या धडकेत महिलेचे दात पडले; चालकावर गुन्हा

**सोलापूर** : भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीच्या धडकेने (एमएच.१३. डीझेड.९९७५) अंबिका विठ्ठल धुळे (वय-३५, रा.धोत्रेकर वस्ती, भवानी पेठ) यांचे दात पडले. ही घटना २९ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास रघोजी ट्रान्सपोर्ट समोरील रस्त्यावर घडली. याप्रकरणी अंबिका धुळे यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार रुपनर हे करीत आहेत.





## दिलीप माने विचार मंचर्फे २१०० गणेशमूर्तींचे वाटप



सोलापूर : गणेशमूर्तींचे वाटप करताना पृथ्वीराज माने.

**दक्षिण सोलापूर** : दिलीपराव माने विचार मंचच्यावतीने घरोघर लंबोदर हा उपक्रम घेऊन यंदाही गणेशमूर्तीचे वाटप करण्यात येत आहे. शहरातील विविध भागात मंचचे अध्यक्ष पृथ्वीराज माने यांनी २१०० गणेशमूर्तीचे वाटप करण्यात आले.

माजी आमदार दिलीप माने यांच्या संकल्पनेतून आणि पृथ्वीराज माने यांच्या मार्गदर्शनात मागील ४-५ वर्षांपासून प्रतीवर्षी गणेशमूर्तीचे वाटप करण्यात येते. यावेळी घरोघर लंबोदर हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शहरातील बसवेश्वर नगर, देगाव, सैफुल, मजरेवाडी, चौगुलेवस्ती, नीलम नगर यसह शहरातील इतर काही भागात मोठ्याप्रमाणात सुंदर अशा गणपती बाप्पाच्या तब्बल २१०० मूर्तीचे वाटप करण्यात आले आहे. स्वतः पृथ्वीराज माने यांनी गणेश भक्तांना मूर्ती वाटप केले. यावेळी माने म्हणाले की, कोरोनाच्या कालावधीमध्ये अनेक जणांची आर्थिक परिस्थिती हलाखीची झाली होती. अशा परिस्थितीत विघ्नहर्ता गणेशाचा उत्सव साजरा करण्यासाठी कोणताही खंड पडू नये म्हणून दिलीप माने विचार मंचच्या वतीने आम्ही मूर्तीचे वाटप करण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून आज तागायत प्रतिवर्षी गणेश मूर्तीचे वाटप केले जात आहे. मांगल्याचा हा सोहळा सर्वांनी उत्साहात साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले.









### युवकाने ब्लेडने मारून घेतले

**सोलापूर** : दारूच्या नशेत घोंगडे वस्ती इंदिरा वसाहत येथे घरगुती टेन्शनमध्ये स्वतःच्या डाव्या हातावर ब्लेडने मारून घेतल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली यात अजय नागनाथ शिंदे (वय-३१,रा.भवानी पेठ) हा जखमी झाला. उपचारासाठी सिव्हिलमध्ये दाखल केले.

### महिला जखमी

**सोलापूर** : कामाला जाताना बेडर पुलावर अचानक चक्कर येऊन पडल्याने डोक्यास मार लागून जखमी झाल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात चिन्ना विराट कलाटकर (वय- ३४, रा. बेडर पूल) हे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हिलमध्ये मित्र राजू बोनसे यांनी दाखल केले.





